MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१९

## संपादकीय

### तयारी संशोधनाची

संशोधन करणे हे एक वेगळेच काम आहे. त्यासाठी लागणारी मनाची तयारी आणि लागणारी कौशल्ये नवीन संशोधकांमध्ये निर्माण करावी लागतात. यासाठी वेगवेगळे मार्ग अंगिकारले जातात. एखाद्या संशोधकांचा सहाय्यक म्हणून काम केल्याने संशोधन वृत्ती आणि संशोधनाचे कसब दोन्ही विकसित होतात असा अनुभव आहे. इंग्लंड मधील प्रसिद्ध शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे हे त्यांचे उत्तम उदाहरण आहे. प्राध्यापक हंफ्री डेव्ही या रॉयल सोसायटीतील एका प्रतिथयश शास्त्रज्ञाचा सहाय्यक म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. थोड्याच काळात फॅरेडे हे स्वत: एक चांगले संशोधक झाले. काही संस्थांमध्ये नवीन संशोधकांसाठी विशेष अभ्यासक्रम राबविण्यात येतात. पी. एचडी. या पदवीसाठी संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी विद्यार्थ्यांने हा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असते. अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांतील विद्यापीठात असे अभ्यासक्रम आहेत. नेमलेला अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला तरच विद्यार्थी पी. एचडी.साठी नोंदणी करू शकतो, अन्यथा नाही. ही पद्धत भारतीय विद्यापीठात फारशी प्रचलित नाही. मुंबईत असलेल्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेत मात्र हा नियम कटाक्षाने पाळला जातो. त्यासाठी या संस्थेत ग्रॅज्युएट स्कूलची (Graduate School) स्थापना करण्यात आली. या ग्रॅज्युएट स्कूलने काय साधले, त्याची पुढची दिशा काय असावी या बाबींवर ऊहापोह करण्यासाठी नुकतीच मुंबईत एक परिषद आयोजित करण्यात आली होती. तिचे नाव GS-50 असे ठेवले होते.

GS-50 (जीएस ५०) याचा अर्थ ग्रॅज्युएट स्कूलची पन्नास वर्षे. टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या स्कूल ऑफ फिजिक्स (School of Physics) मध्ये १९६९ साली औपचारिकरित्या ग्रॅज्युएट स्कूलची स्थापना करण्यात आली. संस्थेत रुजू झालेल्या संशोधकांना पद्धतशीर संशोधन करण्यासाठी तयार करणे हा या स्कूलचा प्राथमिक उद्देश होता. तसे पाहता टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना १९४५ साली झाली. संस्थेच्या सुरुवातीपासूनच येथे मूलभूत असे संशोधन केले जात होते. प्रत्येक मार्गदर्शक आपल्या विद्यार्थ्याला आधी काही वाचन आणि प्रयोग करायला सांगत.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

त्यावर साधकबाधक चर्चा होई. त्यानंतरच त्या विद्यार्थ्याला मुख्य विषयात संशोधन करण्याची परवानगी मिळत असे. अशी पूर्वतयारी वेगवेगळ्या संशोधकांसाठी वेगवेगळी असायची. त्यात सुसूत्रता अशी नव्हती. ती सुसूत्रता आणण्यासाठी ग्रॅज्युएट स्कूलची स्थापना करण्यात आली.

होमी भाभा हे टी. आय. एफ. आर. या संस्थेचे संस्थापक होत. ते स्वत: वैश्विक किरणांवर संशोधन करीत होते. त्यामुळे याच विषयावर संशोधन करायला संस्थेत सुरुवात झाली. यात लवकरच भौतिक शास्त्रातील इतर विभागांची भर पडली. या सगळ्या विभागांना एकत्रितपणे 'स्कूल ऑफ फिजिक्स' असे म्हटले जात असे. सुरुवातीच्या काळात अनेक प्रतिथयश शास्त्रज्ञांना संस्थेत पाचारण केले जात असे. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करण्याची सुवर्ण संधी नवीन संशोधकाना मिळत असे. त्याचबरोबर संशोधनपर लेखांचे वाचन, त्यावर चर्चा, अनुभवी संशोधकांकडून मार्गदर्शन या सगळ्या बाबी सुरूच होत्या. तरीही संशोधक बनू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावेत असा भाभांचा आग्रह होता. अणू ऊर्जा संघटनेच्या कामातून वेळ काढणे त्यांना अशक्य होते. म्हणून त्यांचे काम त्यांच्या सहकाऱ्यांनी पूर्ण करायचे ठरविले. या कामात पुढाकार होता प्राध्यापक भालचंद्र उदगावकर यांचा. दुर्दैवाने प्राध्यापक उदगावकर हे काही वर्षांपूर्वी जग सोडून गेले. त्यांनी सुरू केलेली परंपरा मात्र अजूनही सुरू आहे.


१९६० च्या दशकात 'स्कूल ऑफ फिजिक्स' आणि 'स्कूल ऑफ मॅथेमॅटिक्स' असे दोनच विभाग या संस्थेत होते. स्कूल ऑफ फिजिक्सने आधी म्हणजे १९६९ मध्ये ग्रॅज्युएट स्कूलची स्थापना केली. स्कूल ऑफ मॅथेमॅटिक्स मध्ये त्यानंतर १५ वर्षांनी ग्रॅज्युएट स्कूलची स्थापना झाली. कालांतराने जसे वेगवेगळे विभाग संस्थेत निर्माण झाले तसे प्रत्येक विभागाची गरज लक्षात घेऊन वेगवेगळा अभ्यासक्रम बनवावा लागला. उदाहरण द्यायचे झाले तर होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र या राष्ट्रीय केंद्राचे देता येईल. १९७४ साली या केंद्राची एक प्रकल्प म्हणून सुरुवात झाली. १९८० साली केंद्राला विज्ञान आणि गणित शिक्षणासाठी राष्ट्रीय केंद्र अशी मान्यता मिळाली. तेव्हापासून विज्ञान शिक्षणात पी. एचडी. या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या केंद्राला स्वत:चा असा वेगळा ग्रॅज्युएट कोर्स करून घ्यावा लागला. आजच्या घडीला प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र असे ग्रॅज्युएट स्कूल आहे. असे जरी असले तरी १९६९ साली स्थापन झालेले ग्रॅज्युएट स्कूल (जीएस) हे सर्वात जुने आहे. त्याला या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने टी. आय. एफ. आर. या संस्थेत १ आणि २ नोव्हेंबर रोजी एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कामी टी. आय. एफ. आर. ॲल्युम्नाय असोसिएशन (TIFR Alumni Association) या संघटनेने पुढाकार घेतला. परिसंवाद संस्थेच्या होमी भाभा सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

जीएस ५० या परिसंवादात मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिद्ध संशोधकांना पाचारण करण्यात

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष विसावे/अंक ११/नोव्हेंबर २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | वाकाटक नृपतींचा इतिहास | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची टेटू / ट्रम्पेट फ्लॉवर | श्री. प्रकाश दुधाळकर | ८ |
| ४) | राष्ट्रीय आयुर्वेद दिन | डॉ. व्यंकट पु. धर्माधिकारी | १० |
| ५) | का वाचावी ज्ञानेश्वरी? | भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी | १३ |
| ६) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १५ |
| ७) | अडचणीत रशिया, संधी भारताला | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | १७ |
| ८) | अर्थकारण आणि अमृता प्रीतम | श्री. चन्द्रशेखर टिळक | २० |
| ९) | सेंट पीटर्सबर्गची सफर | श्री. संकेत कुलकर्णी | २४ |
| १०) | तृष्णाकाठः एक संवेदनशील काव्यांजली | श्रीपाद अरुण जोशी | २९ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# वाकाटक नृपतींचा इतिहास

**भाग – १**

*प्राचीन काळात महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या वाकाटक या महत्त्वपूर्ण राजघराण्याविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

प्राचीन काळात भारतावर विविध राजघराण्यांनी राज्य केल्याचे निदर्शनास येते. इसवी सन पूर्व काळापासून ते इसवी सन १००० या काळात भारताच्या निरनिराळ्या भागांवर वेगवेगळ्या नृपतींनी राज्य केल्याचे दाखले आपणास आढळतात. प्राचीनकालीन दख्खनचा विचार केला असता, साधारणतः इसवी सनाच्या ३ ऱ्या शतकापासून ते इसवी सनाच्या ५ व्या शतकापर्यंत, या भागावर वाकाटक राजवंशाचे राज्य असल्याचे लक्षात येते. वाकाटक राजघराणे हे प्राचीनकालीन दख्खनवर राज्य करणारे एक महान राजघराणे होते यात वाद नाही. अभ्यासकांना साधारणतः १८३६ पर्यंत या राजवंशाविषयी माहिती नव्हती. १८३६ साली दुसरा प्रवरसेन या वाकाटक राजाचा एक ताम्रपट मध्यप्रदेशातील शिवणी (सिवणी) जिल्ह्यात सापडला व त्यामुळे वाकाटक राजवटीविषयी व या राजघराण्यातील राजांविषयी जास्त प्रमाणात माहिती मिळण्यास मदत झाली.

इतिहासकारांमध्ये वाकाटकांच्या नेमक्या कालावधीविषयी एकमत नव्हते. काही अभ्यासकांच्या मते त्यांचा कालावधी इसवी सनाच्या ५ व्या शतकातील होता, तर काहींच्या मतानुसार त्यांचे राज्य इसवी सनाच्या ८ व्या शतकात होते. मात्र, आता बहुतेक अभ्यासकांचे एकमत आहे की, वाकाटक हे उत्तरेकडील गुप्त राजघराण्याचे समकालीन होते. यासाठीचा सबळ ऐतिहासिक पुरावा अभ्यासकांच्या हाती १९१२ साली लागला. या वर्षात पुण्यात संशोधकांना वाकाटक राजघराण्यातील प्रसिद्ध राणी प्रभावतीगुप्ता हिचा ताम्रपट सापडला. यात प्रभावतीगुप्ताचा उल्लेख वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन याची पट्टराणी व दिवाकरसेन याची माता असा आलेला आहे. पुण्यात सापडलेल्या या ताम्रपटावरूनच वाकाटकांच्या कालावधीविषयी नेमके अनुमान लावण्यास संशोधकांना मदत झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. वर उल्लेखिलेल्या पुराव्यामुळे सद्यस्थितीत बऱ्याच संशोधकांचे असे मत आहे की, वाकाटक हे गुप्तांचे समकालीन होत. प्रभावती गुप्ता ही प्रसिद्ध गुप्त सम्राट दुसरा चंद्रगुप्त याची कन्या होती.

वाकाटकांविषयीची माहिती मिळविण्यासाठी प्राध्यापक जे. डेबरुईल (Prof. J. Debruil), डॉ. एस. के. अय्यंगार (Dr. S. K. Aiyangar), डॉ. के. पी. जयस्वाल (Dr. K. P. Jayaswal) तसेच डॉ. व्ही. व्ही. मिराशी (Dr. V. V. Mirashi) आणि प्रभुतींनी केलेल्या संशोधनाची फार मदत होते. वाकाटकांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा अजून एक ताम्रपट १९३९ साली विदर्भातील वाशीममध्ये (जिल्हा) सापडला होता. पूर्वी वाशीम हा जिल्हा अकोला जिल्ह्याचाच भाग होता. १ जुलै १९९८ रोजी अकोला जिल्ह्याचे विभाजन करून वाशीम हा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. असो. तर १९३९ साली वाकाटक राजा दुसरा विंध्यशक्ती याचा ताम्रपट सापडल्यामुळेदेखील या राजघराण्याच्या इतिहासाविषयी जास्त माहिती मिळण्यास मदत होते. डॉ. व्ही. व्ही. मिराशींनी या ताम्रपटाचा सखोल अभ्यास करून असे दाखवून दिले आहे की, वाकाटक राजघराण्याच्या एकूण चार शाखा होत्या.

वाकाटकांच्या या चार शाखा पहिला प्रवरसेन याच्या पश्चात निर्माण झाल्या असे मत मिराशींनी मांडले आहे. या चार शाखांपैकी दोन शाखा गौतमीपुत्र व सर्वसेन यांच्यापासून उगम पावून विस्तारीत होत गेल्या. परंतु वाकाटकांच्या इतर दोन शाखांविषयी आपणास माहिती मिळत नाही.

ज्याप्रमाणे वाकाटकांच्या ऐतिहासिक कालावधीविषयी अभ्यासकांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह होते वा आहेत, त्याचप्रमाणे वाकाटक मुलतः उत्तर भारतातले की, दक्षिणेतले याविषयीदेखील वेगवेगळी मते आढळतात. व्ही. ए. स्मिथ या ब्रिटिश इतिहासकाराच्या मते वाकाटक मूळचे मध्य भारतातील असावेत. डॉ. के. पी. जयस्वाल यांच्या मते मात्र ते झाशी जिल्ह्यातील (बुंदेलखंड) बागट (बागाट) या गावचे असावेत. बागटचाच उल्लेख वा उच्चार 'वाकट' वा 'वाकाट' असा झाला असावा असा अंदाज लावणे वावगे ठरू नये. डॉ. जयस्वालांच्या मते या त्यांच्या वाकाट या मूळ ठिकाणाहूनच या नृपतींनी आपल्या राजघराण्यास 'वाकाटक' राजघराणे असे संबोधले असावे. डॉ. मिराशींना मात्र, वाकाटक हे मूळचे उत्तर भारतातील असावेत हे मत मान्य नाही. त्यांच्या मते वाकाटक हे मूळचे दक्षिण भारतातीलच होत.

पहिला वाकाटक राजा ज्याविषयी अभ्यासकांना माहिती मिळते तो म्हणजे पहिला विध्यंशक्ती हा राजा होय. असा मत प्रवाह आहे की, या विध्यंशक्तीचा काल गुप्तांच्याही आधीचा होता. या वाकाटक नृपती विषयीच्या माहितीचा एक प्रमुख स्रोत म्हणजे अजंठा येथील सोळा क्रमांकाच्या लेणीमध्ये सापडलेला शिलालेख होय. सदर शिलालेखावरून आपणास अशी माहिती मिळते की, पहिला विध्यंशक्ती हा एक शूरवीर राजा होता व त्याने अनेक लढायांमध्ये विजय प्राप्त करून आपली कीर्ती व सामर्थ्य प्रस्थापित केले होते. त्याला क्रोध आल्यावर समोरच्याचा थरकाप उडत असे व अशावेळी त्याला काबूत राखणे फार कठीण असे. एवढेच नव्हे तर, आपणास अशी देखील माहिती मिळते की, विंध्यशक्तीचे घोडदळ फार प्रबळ होते व त्याच्या बळावर त्याने आपल्या राज्याचा विस्तार केला होता. विंध्यशक्तीने मध्य दख्खनपासून विदर्भापर्यंत आपली विजयी पताका फडकविली होती. डॉ. मिराशींच्या मते, पहिल्या विंध्यशक्तीने साधारणतः इसवी सन २५० ते इसवी सन २७० या कालावधीत राज्य केले असावे. डॉ. मिराशींनी वाकाटकांच्या दक्षिणेतील मुळाविषयीची माहिती देण्यासाठी आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील अमरावती (सध्याच्या आंध्र प्रदेश या राज्याची राजधानी. हे ठिकाण आंध्र प्रदेशात कृष्णा नदीच्या काठावर वसलेले आहे.) येथे सापडलेल्या एका शिलालेखाच्या तुकड्यावरील कोरलेल्या माहितीचा देखील आधार घेतलेला असल्याचे निदर्शनास येते. या शिलालेखावरून अशी माहिती मिळते की, सदर शिलालेखाचे उपयोजन वाकाटक गृहपती नामक व्यक्ती व त्याच्या दोन पत्नींनी दिलेले दान नोंदविणे हे होते. काही अभ्यासकांच्या मते आंध्रमधील हा वाकाटक गृहपती म्हणजेच वाकाटकांचा मूळ पुरुष होय व त्याच्यापासूनच वाकाटक राजघराण्याचा विस्तार झालेला असावा. डॉ. मिराशींचे हे मत व संशोधन वाकाटक मूळचे दक्षिण भारतातील असावेत असे सिद्ध करण्यास मदत करते यात वाद नाही.

अभ्यासकांच्या मते, पहिल्या विंध्यशक्ती नंतर पहिला प्रवरसेन हा राजा बनला व त्याने साधारणतः इसवी सन २७० ते इसवी सन ३३० या काळात राज्य केले असावे. पहिल्या प्रवरसेनाने नर्मदेपर्यंत मजल मारून तेथील पुरीक राज्याचा राजा शिशुक याचा पराभव केला होता व त्याचे राज्य काबीज केले होते असे अभ्यासक मानतात. काही अभ्यासकांच्या मते, पहिल्या प्रवरसेनाने त्याकाळी पश्चिम भारतातील (काठियावाड व सध्याच्या

पाकिस्तानातील सिंध प्रांत) शक क्षत्रपांचा देखील पराभव केला असावा. मात्र डॉ. मिराशींसारख्या अभ्यासकांना हे मत मान्य नाही. यावरून आपल्या असे निदर्शनास येते की, पहिल्या प्रवरसेनाच्या सैनिकी मोहिमांविषयी अभ्यासकांमध्ये दुमत आहे. काही अभ्यासक म्हणतात की, त्याने आपली विजयी पताका उत्तरेत बुंदेलखंडापर्यंत फडकवली; तर काही अभ्यासकांच्या मते पहिला प्रवरसेन उत्तर महाराष्ट्र, गुजरात तसेच कोकणपर्यंत देखील गेला नसावा. परंतु त्याने उत्तर कुंतल प्रदेशातील (प्राचीन काळात दख्खन – प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्र व दक्षिण कर्नाटकातील भाग 'कुंतल' प्रदेश म्हणून ओळखला जाई.) कोल्हापूर, सातारा व सोलापूर पर्यंतचा प्रदेश काबीज केलेला असावा. तसेच त्याने पूर्वेकडे दक्षिण कोसल, कलींग (सध्याचा ओडिशा) व आंध्रपर्यंतचा प्रदेश जिंकला असावा असे काहींचे मानणे आहे. पहिल्या प्रवरसेनाने मध्य भारतातील भारसैव वा भारशीव (यांचा उल्लेख काही अभ्यासक नागवंश म्हणून देखील करतात) राजघराण्याशी विवाहसंबंध प्रस्थापित केले होते. पहिल्या प्रवरसेनाने आपला पुत्र गौतमीपुत्र याचा विवाह भारशैव राजवंशातील राजकुमारीशी लावून दिला होता. हा अतिशय धार्मिक राजा होता व तो वैदिक धर्माचे पालन करीत असे. त्याने अग्निश्तोम , अप्तोर्मय, उक्त्थय, शोडासिन, वाजपेय, अश्वमेध इत्यादी यज्ञ केले होते. अभ्यासक म्हणतात की, पुराणांमधून आपणास अशी माहिती मिळते की, पहिल्या प्रवरसेनाने वाजपेय यज्ञानंतर ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात दानधर्म केलेला होता. तसेच त्याने 'सम्राट' व 'धर्ममहाराज' या उपाध्यादेखील घेतल्या होत्या. पहिला प्रवरसेन स्वतःस हरितीचा वंशज हरितीपुत्र असे देखील म्हणत असे. देव नामक धार्मिक व विद्वान ब्राह्मण पहिल्या प्रवरसेनचा पंतप्रधान होता. पहिल्या प्रवरसेनला चार पुत्र होते अशी माहिती आपणास मिळते. या चार पुत्रांपैकी एकाचे नाव गौतमीपुत्र तर दुसऱ्याचे नाव सर्वसेन असे होते. त्याच्या इतर दोन पुत्रांच्या नावाविषयी माहिती मिळत नाही. गौतमीपुत्राचे पहिल्या प्रवरसेनाच्या हयातीतच निधन झाले. त्यामुळे प्रवरसेनानंतर त्याचा नातू पहिला रुद्रसेन हा राजा बनला. पहिल्या प्रवरसेनचा दुसरा पुत्र सर्वसेन याने विदर्भातील (वाशीम जिल्ह्यातील) वत्सगुल्म येथे वाकाटक राजघराण्याच्या दुसऱ्या शाखेची स्थापना केली होती. मात्र, प्रवरसेनाच्या दुसऱ्या दोन पुत्रांनी स्थापन केलेल्या शाखांविषयीची माहिती आपणास मिळत नाही.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे, पहिल्या प्रवरसेनानंतर गौतमीपुत्राचा पुत्र व प्रवरसेनाचा नातू पहिला रुद्रसेन हा राजा बनला. त्याने साधारणतः इसवी सन ३३० ते इसवी सन ३५० या कालावधीत राज्य केले. पहिला रुद्रसेन हा प्रसिद्ध गुप्त सम्राट समुद्रगुप्त याचा समकालीन होता. वाकाटक राजघराण्यांशी बांधील असलेल्या राजांवर समुद्रगुप्ताने आपले प्रभुत्व प्रस्थापित केल्याचे मत अनेक अभ्यासकांनी मांडले आहे. त्यामुळे रुद्रसेनाचे राज्य उत्तर विदर्भात नर्मदा नदी तसेच पश्चिमेकडे सह्य पर्वत रांगांच्यामध्ये असलेल्या प्रदेशापुरते स्तिमीत राहिले होते. अभ्यासकांच्या मते, रुद्रसेनाने समुद्रगुप्ताच्या झंझावातासमोर देखील आपले स्वातंत्र्य व राज्य अबाधित ठेवले होते. असे म्हटले जाते की, पहिला रुद्रसेन राजा हा 'शैव' होता व तो भगवान शिवाचेच रूप असलेल्या महाभैरवाचा उपासक होता.

पहिल्या रुद्रसेनानंतर पहिला पृथ्वीसेन हा राजा बनला. त्याने इसवी सन ३५० ते इसवी सन ४०० या कालावधीत राज्य केले असावे असे म्हटले जाते. पहिला पृथ्वीसेन हा देखील 'शैव' होता व त्याच्या ठायी सत्यता, सरळपणा, पराक्रम, वीरता, राजकीय शहाणपण, मनाचा सच्चेपणा /सरळता, बुद्धिमत्ता, करुणा, संयम, उदारपणा इत्यादी गुण होते. त्यामुळेच त्याची तुलना पाच पांडवांमधील धर्मराजा वा युधिष्ठिरासोबत केली जात असे. त्याने शांततेच्या धोरणाचा पुरस्कार करून आपली प्रजा सुखी

व समाधानी राहील याची दक्षता वा काळजी घेतली होती. असे म्हटले जाते की, पृथ्वीसेनाने आपली राजधानी नागपूर नजीकच्या 'नंदीवर्धन' (सध्याचे नागर्धन) येथे हलविली होती.

पहिल्या पृथ्वीसेनाने आपला पुत्र दुसरा रुद्रसेन याचा विवाह प्रसिद्ध गुप्त सम्राट दुसरा चंद्रगुप्त याची कन्या प्रभावतीगुप्ता हिच्याशी लावून दिला होता. या विवाहसंबंधामुळे गुप्त व वाकाटक ही दोन राजघराणी एकत्र आणण्याचे काम केले. एवढेच नव्हे तर, काही अभ्यासकांच्या मते, प्रभावतीगुप्ता वाकाटक घराण्याची स्नुषा बनल्यानंतर आपसूकच निदान अप्रत्यक्षरित्या तरी गुप्तांचा वाकाटक राजघराण्यावर प्रभाव पडण्यास सुरुवात झाली. याचे एक उदाहरण द्यावयाचे झाल्यास, आपण पाहिले की, वाकाटक राजे हे प्रामुख्याने शैव पंथीय होते. मात्र, नंतरच्या काळातील वाकाटक राजांनी वैष्णव पंथाचा स्वीकार करून भागवत धर्माची पताकादेखील फडकविल्याचे निदर्शनास येते. विष्णुची उपासना म्हणजे, गुप्तांचा वाकाटकांवर पडलेला प्रभाव अधोरेखीत करते यात वाद नाही, कारण गुप्तकाळात भगवान विष्णुच्या उपासनेला फार महत्त्व होते. भगवान विष्णूची उपासना गुप्त काळात जनसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रुजली व लोकप्रिय झाली असे अभ्यासकांचे मत आहे. असो. दुसऱ्या रुद्रसेनाचे राजा बनल्यानंतर अल्पावधीतच निधन झाले व त्यानंतर त्याच्या दोन अल्पवयीन पुत्रांच्या वतीने काही काळ प्रभावतीगुप्ताने राज्यकारभार चालविल्याचे निदर्शनास येते.

आपण वर उल्लेख केलेलाच आहे की, दुसऱ्या रुद्रसेनाची कारकीर्द अतिशय अल्पावधीची ठरली. त्याने जेमतेम पाच वर्ष राज्य केले व त्याचे निधन झाले. त्यानंतर त्याच्या दिवाकरसेन व दामोदरसेन या अल्पवयीन मुलांचे त्यांची माता प्रभावतीगुप्ता हिच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली राज्य सुरू झाले.

असे म्हटले जाते की, दिवकरसेनाने इसवी सन ४०५ ते इसवी सन ४२० या कालावधीत म्हणजेच जवळ-जवळ पंधरा वर्षांपर्यंत राज्य केले. इसवी सन ४२० मध्ये दिवाकरसेनचा भाऊ दामोदरसेन हा राजा बनला व त्याने साधारणतः इसवी सन ४२० ते इसवी सन ४५० या कालावधीत म्हणजेच तीस वर्षे राज्य केले. दामोदरसेनने, दुसरा प्रवरसेन ही उपाधी घेतली होती व त्याने विदर्भातील वर्धा जिल्ह्यात प्रवरपूर नामक नवीन शहर निर्माण करून वाकाटकांची राजधानी नंदीवर्धन येथून प्रवरपूर नगरीत स्थलांतरीत केली होती. दामोदरसेन ऊर्फ दुसरा प्रवरसेन याने प्राकृत भाषेच्या व त्या भाषेतील साहित्याच्या विकासास प्रोत्साहन देऊन प्राकृत साहित्यात मोठी भर घातली होती. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे त्याने प्राकृत भाषेत 'सेतुबंध' नामक प्रसिद्ध काव्य रचले होते. अभ्यासकांच्या मते, श्रीरामाने रामेश्वरम् येथून लंकेला जाण्यासाठी बांधलेला सागरी सेतू व लंकेवर केलेली चढाई हा या महाकाव्याचा विषय होता. मराठी व प्राकृत भाषेचे अभ्यासक 'सेतुबंध' या काव्यसंग्रहाला प्राकृत भाषेतील एक मानबिंदू मानतात व प्रवरसेनाच्या काव्यशैलीची प्रशंसा करतात. दुसऱ्या प्रवरसेनाने आपली राजधानी प्रवरपूर येथे प्रभू रामचंद्राचे मंदिरदेखील बांधले होते.

दुसऱ्या प्रवरसेनानंतर नरेंद्रसेन गादीवर आला. अज्झित भट्टारिका ही कुंतल राजकन्या नरेंद्रसेनची राणी होती. अभ्यासकांचे असे मत आहे की, कुंतलचा राष्ट्रकूट राजा देवराज हा तिचा पिता असावा. नरेंद्रसेनने इसवी सन ४५० ते इसवीसन ४७० या कालावधीत राज्य केले. नरेंद्रसेनाने उत्तरेत व पूर्व भारतात दिग्विजय प्राप्त केला होता असे अभ्यासकांचे मत आहे व कोसल (साधारणतः उत्तर प्रदेशातील अवध), मेकल (सध्याचे छत्तीसगढ), तसेच माळवा (पश्चिम मध्य प्रदेश) इत्यादी प्रदेशांतील राजे त्याची आज्ञा मानत असत. नरेंद्रसेनाच्या

मानवी संबंध धावणाऱ्या आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणे नसतात. ते असतात
औदुंबराच्या आडव्यातिडव्या पाय वाटासारखे.

कारकीर्दीच्या अखेरीस 'नळ' वा 'नल' (हे राजघराणे होते) राजाने वाकाटकांच्या साम्राज्यावर हल्ला केल्याचे निदर्शनास येते व काहीकाळ नंदीवर्धन (वाकाटकांची पूर्वीची राजधानी) हे ठिकाणदेखील ताब्यात घेतल्याची माहिती मिळते. वाकाटकांच्या या पराभवाची माहिती आपणास वाकाटकांच्या शिलालेखांवरून देखील मिळते.

नरेंद्रसेन नंतर त्याचा पुत्र दुसरा पृथ्वीसेन हा राजा बनला. दुसऱ्या पृथ्वीसेनने आपले पिताश्री नरेंद्रसेन यांच्यावर आलेली नामुष्की व पराभव पुसून काढल्याचे निदर्शनास येते. दुसऱ्या पृथ्वीसेनाने शत्रूला आपल्या राज्यातून हुसकावून तर लावलेच, मात्र नळांच्या राज्यावर (प्रदेशांवर) हल्ला करून थेट त्यांची राजधानी उद्ध्वस्त केली. दुसऱ्या पृथ्वीसेनाने पुन्हा एकदा वाकाटकांची इभ्रत वाढविली. दुसरा पृथ्वीसेन हा भगवान विष्णुचा उपासक होता. तो विष्णुचा उपासक असल्यामुळे तो स्वतःचा उल्लेख 'परमभागवत' असा देखील करत असे. पहिल्या प्रवरसेनाचा नातू व गौतमीपुत्राचा पुत्र पहिला रुद्रसेन याने स्थापन केलेल्या वाकाटकांच्या शाखेतील दुसरा पृथ्वीसेन हा शेवटचा राजा होय असे अभ्यासकांचे मत आहे. दुसऱ्या पृथ्वीसेनाचा इसवी सन ४९० मध्ये मृत्यू झाला असावा असे मानले जाते व त्याच्या मृत्यू पश्चात 'वत्सगुल्म' (अकोला–'वाशीम' जिल्हा–विदर्भ) येथून राज्य करणाऱ्या वाकाटकांच्या दुसऱ्या शाखेतील राजा, हरिसेन याने हे राज्य ताब्यात घेतले असावे असा मतप्रवाह आहे.

आपण वर नमूद केल्याप्रमाणे वाकाटकांची दुसरी एक शाखा 'वत्सगुल्म' येथून राज्य करत होती. या शाखेची स्थापना पहिला प्रवरसेन याचा दुसरा पुत्र सर्वसेन याने केली होती. 'वत्सगुल्म' (सध्याचा वाशीम जिल्हा–विदर्भ) हे ठिकाण त्याकाळातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असावे असे संशोधकांचे मत आहे. सर्वसेनाने 'धर्ममहाराज' अशी उपाधी घेतली होती. ज्याप्रमाणे अगोदर नमूद केलेल्या दुसऱ्या प्रवरसेनाने प्राकृत भाषेत 'सेतुबंध' या महाकाव्याची रचना केली होती त्याचप्रमाणे सर्वसेनने प्राकृत भाषेत 'हरिविजय' या काव्याची रचना केली होती. एवढेच नव्हे तर, सर्वसेनाची साहित्यात एवढी रुची होती की, त्याने अनेक प्राकृत गाथांचे निर्माण केले होते. असे म्हटले जाते की, सर्वसेनाला त्याच्या या वाङ्मय निर्मितीत रवी नामक मंत्र्याने मदत केली होती. सर्वसेनने साधारणतः इसवी सन ३३० ते इसवी सन ३५५ या कालावधीत राज्य केले होते.

क्रमशः

**संदर्भ**

एनशियंट इंडिया : व्ही. डी. महाजन

ॲन ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : आर. सी. मजूमदार, एच. सी. रेचौधरी, कालिकिंकर दत्ता

महाराष्ट्र संस्कृती : डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे

ॲन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडीयन हिस्ट्री : दामोदर धर्मानंद कोसंबी

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••



श्रद्धा ही सामर्थ्यवान असते. कशावर तरी श्रद्धा ठेवल्याशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही.

# ओळख वनस्पतींची
# टेटू / ट्रम्पेट फ्लॉवर

*'टेटू / ट्रम्पेट फ्लॉवर' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, मानवी विकासात त्याचा सर्वात जवळचा मित्र म्हणजे झाड. अनादी काळापासून आतापावेतो त्या झाडांवरच तो अवलंबून आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ही झाडे व वनस्पती त्याची साथ देत असतात. अशा या जिवलग मित्राच्या स्वभावाबाबत गुणदोषांबाबत अधिकाअधिक माहिती मिळविण्याचा देखील माणसाचा प्रयत्न अनादी काळापासूनच चालू आहे. भारतात त्याबाबतची परंपरा अगदी प्राचीन आहे. भारतीयांची जगाला दिलेली देणगी म्हणजे आयुर्वेद. सुमारे ३००० वर्षांपासून वा त्यापूर्वीपासून वनस्पतींच्या औषधी गुणाबाबत भारतीयांना माहिती होती. त्या माहितीचा आधार घेऊनच नित्य नवी औषधे आजही निर्माण होत आहेत. बरीचशी झाडे किंवा वनस्पती आपल्या परिसरात असतात. त्याबाबत आपणास थोडीफार माहिती असते. मात्र दूर जंगलात असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या व उपयोगी वनस्पतींबाबत मात्र आपण अनभिज्ञ असतो. अशाच फारशा प्रचलित नसलेल्या परंतु अत्यंत उपयोगी अशा वनस्पतीं संबंधी जेव्हा विचार करतो तेव्हा प्रथम समोर येते ते टेटूचे झाड.



टेटू हा एक मध्यम उंचीचा व आकाराचा वृक्ष. उंची १२ मीटर पर्यंत वाढते. मुळचा भारतीय असलेला हा वृक्ष मुख्यतः पानगळीच्या जंगलात आढळतो. सह्याद्रीच्या कडेकपारीत, तसेच कोकण तथा पश्चिम घाटात देखील याचे वास्तव्य आढळते. याचे इंग्रजी नाव आहे Indian trumpet flower अन शास्त्रीय नाव आहे Orodylum indicum. या नावातच याचे भारतीयत्व ध्वनीत होते. हिमालयाच्या पायथ्यापासून पूर्वेकडे मलेशियापर्यंत, उत्तरेत चीन व दक्षिणेत श्रीलंका येथेही याचे वास्तव्य आढळते. तसेच या सर्व प्रदेशांतील लोकांचे महत्त्वाचे औषधी झाड म्हणून या वृक्षाचा नावलौकिक आहे.

जगातील सर्वात मोठे संयुक्त पान म्हणून टेटूच्या पानाचा नावलौकिक आहे. याच्या पानांची एकूण लांबी दोन मीटर पर्यंत असते. मुख्य देठावर समोरा समोर असणाऱ्या उपदेठाच्या जोड्या व त्यावर दोन्ही बाजूला समोरासमोर असणाऱ्या पर्णिका हे याचे वैशिष्ट्य. पर्णिकांची लांबी १० ते १५ से.मी. आकार लंबगोलाकृती असा. झाडाचे खोड सरळ उंच वाढणारे. रंग राखाडी, पोत खरबरीत.

ज्याच्या जीवनामध्ये निश्चित ध्येय नसते त्यालाच वेळ घालविण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.

ट्रम्पेट फ्लॉवर म्हणून ओळखले जाणारे याचे वैशिष्ट्यपूर्ण फूल ५ ते ६ से.मी. लांबीचे आणि ग्रामोफोनच्या कर्ण्यासारखे किंवा बिगुलाच्या आकारासारखे असते. रंग काळपट जांभळा किंवा पिवळसर जांभळा. ही फुले रात्री फुलतात. फुलांना अति पिकलेल्या फळांसारखा किंवा कुजकट असा वास असतो. अर्थात निसर्गात गंध हा महत्त्वाचा. सुगंध, दुर्गंध या केवळ मानवी संकल्पना आहेत. बऱ्याच झाडांचा किंवा फुलांचा सुगंध देखील काही लोकांना नकोसा असतो. पारिजातकाचा सुगंध न आवडणारी माणसे मी पाहिली आहेत. टेटूच्या गंधाने आकर्षित होऊन वटवाघळे फुलाकडे धाव घेतात. जाड मांसल पेल्यासारख्या आकार असलेल्या या फुलांच्या मधोमध असलेल्या मधूर रसाची मेजवानी त्यांना मिळते. या बदल्यात झाड त्यांच्याकरवी परागीकरणाची क्रिया करवून घेते. परागीकरणा नंतर सकाळी ही फुले गळून खाली पडतात. परागीकरण न झालेली काही फुले दुसऱ्या दिवशीही झाडावर दिसतात. मात्र ती म्लान व कोमजलेली व कधीही गळून पडतील अशा अवस्थेत असतात. एप्रिलपासून जुलै-ऑगस्टपर्यंत हा फुलण्याचा कालावधी असतो.

जुलै, ऑगस्टमध्ये या झाडाला लांब अन् तलवारीच्या आकाराच्या शेंगा लागलेल्या दिसतात. या शेंगा जून होण्यापूर्वी काढून त्याचे लोणचे घालतात. टेटूचे लोणचे विदर्भात फारच लोकप्रिय आहे. हे लोणचे देखील आरोग्यास चांगले असल्याची तिकडे धारणा आहे. त्यामुळे या दिवसात बाजारात या शेंगा विकण्यासाठी आलेले आदिवासी किंवा जंगल परिसरात असणारे ग्रामीण लोक हमखास दिसतात.

टेटूच्या मुळांचा तसेच सालीचा औषधासाठी वापर होतो. च्यवनप्राश तसेच दशमुलारीष्ट व पंचारिष्ट या औषधांमध्ये टेटूचे महत्त्वाचे स्थान आहे. या झाडाच्या मुळांच्या सानिध्यातील बुरशीमध्ये विशिष्ट बॅक्टेरियांची वाढ होत असते. या बुरशीपासून विविध औषधे बनविली जातात. टेटू स्वतंत्र किंवा इतर औषधांच्या सोबतीने उपचारासाठी वापरले जाते. ॲलर्जीपासून होणारे आजार, कावीळ, अस्थमा, गळ्यामधील संसर्ग, अतिसार व आमांश यावर सालीचा तसेच मुळांच्या सालीचा वापर करतात. अर्थात कोणत्याही वनस्पतींचा औषधी म्हणून वापर करतांना तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. अन्यथा अपाय होऊ शकतो. चीनमधील वनौषधी परंपरा देखील भारताइतकीच जुनी आहे. तेथेही या झाडाच्या फळ, साल तथा मुळांचा विविध आजारासाठी वापर केला जातो.

नवीन संशोधनानुसार या झाडांच्या पानामध्ये देखील औषधी द्रव्ये आढळून आली आहेत. ही झाडे मुंबई परिसरात संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, येऊर, कर्नाळा पक्षी अभयारण्य येथे हमखास पाहता येतील. तसेच कोकणातही बऱ्याच ठिकाणी ही झाडे आढळली आहेत. शोभेचे झाड म्हणून शहरात व उद्यानात लावावयास हे झाड योग्य आहे असे वाटते. तसेच या झाडाची फारशी मिजास नसल्याने, तसेच सुरुवातीचे एक वर्ष काळजी घेतली की मग झाड स्वतःच स्वतःची काळजी घेत वाढू लागते. याची लागवड यांच्या चपट्या व पंख असलेल्या बियांपासून करता येईल.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी : ९८६९५४१९६६
Email : dudhalkar@gmail.com

●●●

---

पाण्याचा एक थेंब महत्त्वाचा नसेल; पण ह्या थेंबाची संततधार जर दगडावर पडली तर ती धार दगडाला विंधते.

# राष्ट्रीय आयुर्वेद दिन
## (२५ ऑक्टो.२०१९)

*केंद्रशासनाच्या आयुष मंत्रालयातर्फे धन्वंतरी जयंती २५.१०.२०१९ हा दिवस राष्ट्रीय आयुर्वेद दिन म्हणून साजरा केला जात आहे. यानिमित्त डॉ. व्यंकट पु. धर्माधिकारी सहाय्यक संचालक आयुष यांचा लेख प्रसिद्ध करीत आहोत – संपादक*

**निरामय चिरजीवनासाठी आयुर्वेद**

**Ayurveda for Longevity**

आयुष मंत्रालय, भारत सरकारमार्फत सन २०१६ पासून धन्वंतरी जयंती हा दिवस राष्ट्रीय आयुर्वेद दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे. यावर्षीच्या ४ थ्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे घोषवाक्य Ayurveda for Longevity अर्थात '**निरामय चिरजीवनासाठी आयुर्वेद**' हे आहे. प्रत्येक व्यक्तींनी आरोग्यसंपन्न स्थितीत १०० वर्षे जगावे हे आयुर्वेदशास्त्राला अपेक्षित आहे. आयुर्वेदशास्त्राचे प्रयोजनच मुळी हे– '**स्वस्थस्य स्वास्थ रक्षणम आतुरस्य विकार प्रशमनम च!**' हे आहे. अर्थात निरोगी व्यक्तीच्या आरोग्याचे संरक्षण करणे आणि एवढे करूनही जर रोग झालाच तर त्यावर उपचार करणे हे आयुर्वेदाचे प्रयोजन आहे. यामध्ये निरोगी व्यक्तीचे आरोग्य टिकवून ठेवण्यास सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. रोगावर उपचार करणे ही दुय्यम बाब आहे.

सध्या सरासरी आयुर्मान हे साधारण ७० वर्षे आहे. आयुर्मान वाढते आहे पण ते निरामय नाही. बहुतेकांना मधुमेह, रक्तदाब, संधीवात, आम्लपित्त इ. विविध आजारांसोबत जगावे लागत आहे. त्यामुळे निरामय अर्थात कुठलाही आजार नसलेले दीर्घायुष्य सर्वांना प्राप्त होण्याच्या दृष्टीने आयुर्वेदिक आहार–विहार इ. सुत्राचा अवलंब करून सर्वांनी आनंदी, निरोगी दीर्घकाळ जगावे हा यावर्षीच्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनासाठीचा विषय केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने ठरविला आहे.

चरकसंहिता हा आयुर्वेद शास्त्रातील महत्त्वाचा असा ग्रंथ आहे. या संहितेचा प्रारंभच मुळी दीर्घन्जीवितीय (दीर्घकाळ जगण्यासाठी करावयाच्या बाबीचे वर्णन) या अध्यायापासून झालेला आहे. यावरून आरोग्य संपन्न दीर्घायुष्यावर आयुर्वेदाचा किती भर होता हे स्पष्ट होते.

दीर्घायुष्य जगण्यासाठी कुठलाही आजार नसणे अत्यंत आवश्यक बाब आहे. कुठलाही आजार नाही त्या व्यक्तीला निरोगी म्हणायचे का? आरोग्य म्हणजे काय? असा प्रश्न समोर येणे स्वभाविकच आहे. याबाबत आयुर्वेदाने आरोग्याची पुढील व्याख्या केली आहे.

समदोषः समाग्निः च समधातु मलक्रियाः ।<br>
प्रसन्न आत्मा इन्द्रिय मनः स्वस्थ इत्यभिधीयते ।।

अर्थात शरीराला धारण करणारे तीन दोष (वात, पित्त, कफ) सात धातू (रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र) तीन मल (मूत्र, स्वेद, पुरीष) आणि अग्नि, पचनशक्ती हे १४ घटक यांची कार्य प्राकृत असणे, इंद्रिये (ज्ञानेन्द्रीये, कर्मेंद्रिये) आणि त्याचबरोबर मन, आत्मा प्रसन्न असणे हे स्वस्थ अर्थात निरोगी माणसाचे लक्षण आयुर्वेदाने सांगितले आहे. 'मन करा रे प्रसन्ना सर्व सिद्धीचे कारण' हे संतवचन प्रसिद्ध आहे. कारण सध्या प्रचंड धावपळ, ताणतणाव यामुळे मानसिक

जीवन क्षणभंगूर आहे आणि कडूही आहे असे सगळेच सांगत आले; पण त्याचा प्रत्येक क्षण अडुळशाच्या फुलासारखा देठात मधाने भरलेला असतो.

विकारांचे प्रमाण वाढत आहे. इंग्रजीत याला डिसीज (डीस अट इज) अर्थात 'स्वस्थता नाही' अशी दोन शब्दांची व्याख्या केलेली आहे.

निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य पाहिजे असेल तर आजार का होतात हे समजून घेणे खूप आवश्यक आहे. जेणेकरून आजार होण्याची कारणे समजून घेऊन ती आपण टाळू शकतो.

आयुर्वेदात आजार होण्याची दोन प्रमुख कारणे सांगितली आहेत.

**१) रोगा सर्वेऽपि मन्दोऽग्नो –** भूक न लागणे, अपचन. त्यामुळे शरीराला आवश्यक असणारे घटकाचे शरीरात शोषण न होणे, परिणामी अपाचित घटकद्रव्ये शरीरात साठल्याने वेगवेगळ्या आजाराची निर्मिती होते.

अग्निमांद्य (भूक न लागणे) हे लक्षण असल्याने पचायला जड असलेल्या बलवर्धक द्रव्याचा वापर करणे सहज शक्य होत नाही. यासाठी प्रथमतः जठराची पचनशक्ती वाढवून ती सुधारल्यानंतर हळूहळू बल्य पदार्थांचा वापर युक्तीने करावा. प्रथमतः लघु पचण्यास हलका आहार देऊन, अग्नि वाढवून भूक चांगली लागू लागली की, मगच गुरु, बल्य असे पदार्थ देखील योग्य प्रमाणातच सेवन करावेत. यामध्ये भूक नसताना जेवण व उलट भूक लागल्यावर कामाचा ताणतणाव इ. मुळे जेवण न घेणे हे अग्नि मंद होण्याचे प्रमुख कारण आहे. आहारामध्ये आंबवलेले पदार्थ, ब्रेड, इडली, डोसा, वडापाव, पनीर, दही इ. अनेक पदार्थांच्या सेवनाने अग्नि मंद होतो. जागरण, एअरकंडिशन मध्ये १२ – १२ तास काम, शारीरिक हालचालीचा आभाव हे पण आजारी पडण्याचे, अग्निमंद होण्याचे महत्त्वाचे कारण आहे.

**२) रोगासर्वेऽपि जायन्ते वेगोदीरणधारणे –** प्राय: सर्व रोगाचे कारण हे मल मूत्र इ. चा वेग आल्यावर तो थांबवून धरणे हे आहे. शौचाला लागल्यावर किंवा लघवी आल्यावर कामाच्या व्यापात ती अडवून ठेवणे हे प्राय: व्यवहारात घडते ते चुकीचे आहे. यामध्ये मल, मूत्र यासोबत शिंक, ढेकर, सर्दी, जांभई इ. चा समावेश आहे. याचेही धारण करू नये.

मलमूत्रविसर्जन मलमूत्राचा वेग आला तरच मलमूत्रविसर्जन करावे. शौचाला न येता प्रयत्नपूर्वक मलमुत्रांचे विसर्जन करू नये. शौचानंद अर्थात मलप्रवृत्ती साफ झाल्यावर होणारा आनंद खरंच, ज्यांना दररोज शौचास साफ होत नाही त्यांना विचारा, जर एखादे दिवशी शौचाला साफ झाल्यावर किती प्रसन्न (फ्रेश) वाटते ते! आयुर्वेदाच्या दृष्टीने मल मूत्राचा वेग आल्यावर तो रोखू नये व वेग आला नसताना बळजबरीने जाऊ नये याबाबत आयुर्वेदातील वचन प्रसिद्ध आहे.

**'प्रवर्तयेत प्रचलित न तू यत्नात उदिरयेत'**

बँक, शाळा, कार्यालय यांचे एक विशिष्ट वेळापत्रक असते. ठरावीक वेळातच या ठिकाणी आपल्याला जायला लागते. अगदी त्याप्रमाणे आपले शरीर निरोगी राहण्याच्या दृष्टीने आपले वेळापत्रक नको का करायला? कधी झोपायचे, सकाळी कधी उठायचे, जेवणाच्या वेळा, व्यायाम, प्राणायाम, योगासने, प्रार्थना, ध्यानधारणा याचे एक वेळापत्रक करणे आणि त्या वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. अशाप्रकारे संपूर्ण दिवसाचे जे नियोजन आहे त्यालाच आयुर्वेदात दिनचर्या असे म्हटले आहे. यामध्ये ब्राह्ममुहूर्तावर (सूर्योदयापूर्वी २ तास) उठणे, मलमूत्र विसर्जन, दंतधावन व जीव्हानिर्लेखन, नस्य (नाक तेल किवा तूप सोडणे) गंडूष (औषधीयुक्त द्रव्यांनी गुळण्या करणे ) अभ्यंग, व्यायाम, उटणे लावून स्नान करणे इ. बाबींचा अंतर्भाव होतो.

आयुर्वेद हे एक प्राचीनतम भारतीय वैद्यकशास्त्र आहे. आयुर्वेदाने एका वर्षाचे सहा वेगवेगळ्या कालामध्ये

---

विभाजन केले आहे. या सहा कालखंडालाच ऋतू असे म्हटले आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ऋतूंमध्ये वातावरणातील होणाऱ्या बदलानुसार आपला दैनंदिन वेळापत्रकात थोडाफार बदल करावा लागतो. यालाच आयुर्वेदात 'ऋतुचर्या' असे म्हटले आहे. प्रत्येक ऋतूत आढळणारे हवामान, आजूबाजूची परीस्थिती, त्या कालावधीत शरीरात असणारी बातपित्तकफ या त्रिदोषांची स्थिती या सर्वांचा समग्र विचार करून शरीरासाठी हितकर आरोग्यदायी अशा बाबींचे सविस्तर मार्गदर्शन म्हणजे ऋतुचर्या.

अशाप्रकारे दिनचर्या आणि ऋतुचर्येचे अनुपालन करण्याचा संकल्प राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या दिवशी आपण केला तर निश्चितपणे संभाव्य आजार टाळून निरोगी असे दीर्घायुष्य जगता येणे शक्य होईल

दीर्घायुष्य जगण्यासाठी व्यायाम हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.व्यायामामुळे शरीर डौलदार, पुष्ट व कांतीमान होते. भूक चांगली लागते. आळस नाहीसा होतो. शरीराला हलकेपणा येतो. स्रोतसे शुद्ध होतात. श्रम, तहान, उष्ण, शीत आदी गोष्टींची सहनशीलता वाढते. व्यायाम करणाऱ्याला शत्रुचे भय नसते. वयाने, रूपाने निकृष्ट असणाऱ्यांना सुद्धा व्यायामामुळे सौंदर्य येते. त्यांना सर्व प्रकारचे अन्न पचते. थोडक्यात, आपल्या दैनंदिन दिनचर्येत 'व्यायामाचे' स्थान अत्यंत महत्त्वाचे असून, प्रत्येकानी दररोज व्यायाम करून निरोगी राहणे हे देशाच्या हिताचे आहे.

आरोग्य कायम टिकवण्यासाठी आहारातील बदल, श्रमानुसार आहाराची योजना करावी. जेवणात तोंडी लावण्यासाठी आले, पुदिना, लसून, कोथिंबीर यांची चटणी वापरावी. आहारात दह्याचा वापर शक्यतो टाळावा. त्याऐवजी ताकाचा वापर करावा. ते आरोग्यासाठी अत्यंत हितकर आहे. रात्रीचे जेवण लवकर करावे. मी तर म्हणेन याबाबत सर्वांनी जैन धर्माप्रमाणे वागावे. यामुळे हृदयरोग, खोकला, दमा, आमवात, संधीवात, मुळव्याध, मधुमेह, स्थौल्य इ. रोग बळावत नाहीत. फ्रीजचा वापर शक्यतो टाळावा.

**तच्य नित्य प्रयुंज्जित स्वस्थ येनानुवर्तते ! अजातानां विकारानां अनुत्पत्तीकरं च यत !**

अर्थात ज्या पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्य टिकून राहते. आणि जो आहारविहार रोग निर्माण होऊ देत नाही त्याचे सेवन करावे, असे मार्मिक मार्गदर्शन आयुर्वेदात सांगितले आहे.

आहार निद्रा व ब्रह्मचर्य हे आयुर्वेदात त्रिस्तंभ अर्थात अत्यंत महत्त्वाच्या बाबी सांगितल्या आहेत. आहार योग्य नियमानुसार घेणे, जागरण न करता झोप वेळेत घेणे आणि ब्रह्मचर्याचे संयमाने पालन करणे या तिन्हीं बाबी आपले आरोग्य उत्तम राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

सदवृत्त अर्थात आचार रसायन हे आयुर्वेदाचे वैशिष्ट आहे. सदाचार संपन्न जीवन जगणे, ध्यानधारणा योग इ. चे पालन करणे इ. बाबी अंतर्भूत आहेत. यामुळे ताणतणावजन्य होणारे आजार (मधुमेह, रक्तदाब, आम्लपित्त इ.) टाळून आपली मनस्थिती उत्तम राखण्यास मदत होते.

आयुर्वेदात स्वास्थ्य टिकवण्यासाठी अनेक रसायन द्रव्ये सांगितली आहेत. यामध्ये आवळा, ज्येष्ठमध, पिंपळी, लसूण, अडुळसा, गुळवेल, जिरे, धने, च्यवनप्राश इ. चा वापर अवश्य करावा. आपण कुठल्याही वयाचे असाल तरी तेथपासून आपले उर्वरित आयुष्य निरोगी राहण्याच्या दृष्टीने दिनचर्येची आखणी करावी. जीवनभर औषधांच्या कुबड्या सांभाळायच्या नसतील तर योग्य

(पृष्ठ क्र.२३वर)

# का वाचावी ज्ञानेश्वरी?

*मराठी संत वाड्मयातील मुर्धन्य स्थानी असलेल्या संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे वाचन का करावे हे विशद करणारा लेख - संपादक*

'वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी' असं संत सांगून गेले. पण खरंच का वाचावी ज्ञानेश्वरी?

सगळ्यात महत्त्वाचं कारण म्हणजे ज्ञानेश्वरी माउलींनी लिहिली. नऊ महिने ओझं वागवून, प्रसुतीच्या जीवघेण्या यातना सहन केल्यावर स्त्री एका लेकराची आई होते; मग जी विश्वाची माउली आहे तिला किती यातना झाल्या असतील?

आणि ही जी विश्वाची माउली आहे तिचं ज्ञानेश्वरी लिहिताना वय किती? तर अवघे सोळा वर्षे!

महाराष्ट्रातल्या लावणीकारांनी, 'सोळावं वरीस धोक्याच, असं म्हटलंय.' पण याच सोळाव्या वर्षी माउलींनी अखिल विश्वाला संसाराचा धोका पार करून मोक्ष मिळवून देणारं दिव्य रसायन दिलं.

माउलींनी ज्ञानेश्वरी 'बाळ जै जेवविजे। तै घासु विसा ठायी कीजे।' या हळुवारपणाने लिहिली. एखादी माता आपल्या मुलाच्या कल्याणासाठी त्याला प्रत्येक गोष्ट वेगवेगळ्या तऱ्हेने समजावून सांगते. त्याच तळमळीतून ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्द आला आहे. ज्ञानेश्वरीत आला नाही असा एकही विषय या जगात नाही.

आता ज्ञानेश्वरी वाचल्यावर खरंच कळते का? हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. ज्यांनी जन्मभर ज्ञानेश्वरीवर प्रवचने केली, एका एका अक्षरावर आठ-आठ दिवस बोलण्या इतकं ज्याचं अगाध ज्ञान ते धुंडामहाराज देगलुरकर एकदा म्हणाले की, 'मला ज्ञानेश्वरी समजली म्हणून मी ती सांगतच नाही; तर मला कळावी म्हणून सांगतो.'

पण असं असलं तरी ज्ञानेश्वरी एकदा हातात घेतली की ती खाली ठेवावीच वाटत नाही. माउलींच्याच शब्दात सांगायचं झालं तर 'ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका।'

माझा मराठीच बोलु कौतुके। परी अमृतातेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। अध्यय ६-१४

या रसिकपणाचा ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक ओवीतून प्रत्यय येतो.

ऐका रसाळपणाचिया लोभा। की श्रवणींची होती जिभा।
बोले इंद्रिया लागे कळंमा। एकमेकां। अध्याय ६-१६

माउली म्हणतात की, अक्षरांच्या रसाळपणाच्या आशेने कानालाच जिभा उत्पन्न होतील. सर्व इंद्रिये शब्दांच्या रसग्रहणासाठी एकमेकांत भांडत बसतील. जीभ म्हणेल हा आमचा रस विषय आहे. तर नाकाला हा गंध विषय वाटेल आणि ज्ञानेश्वरीतील शब्दरचना इतकी अपूर्व की डोळ्यांना वाटेल हे रूपविषयाचे कोठारच उघडले आहे.

संतश्रेष्ठ गुलाबराव महाराजांनी ज्ञानेश्वरी वाचावयास सांगून एका वेश्येचा उद्धार केल्याची आख्यायिका आहे.

नामा म्हणे ग्रंथ। श्रेष्ठ ज्ञानदेवी।
एक तरी ओवी। अनुभवावी।।

ज्ञानेश्वरी वाचल्याने समाधान मिळते. मनःशांती लाभते. रोजच्या जगण्यासाठी लागणारी ऊर्जा मिळते.

मला ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीत -

तू मन हे मीच करी। माझिया भजनी प्रेम धरी
सर्वत्र नमस्कारी। मज एकाते।। अध्याय ९-५१७

असं सांगणारा तत्त्वज्ञ गोपालकृष्ण दिसतो. तर शेजारीच -

अहो अळुमाळ अवधान द्यावे। येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावे बाप श्रवणेंद्रिया दैवे। घातली माळ।। अध्याय ९-५३४

असं आर्जव करणारे ज्ञानेश्वर माउली दिसतात.

ज्ञानेश्वरीचं सगळंच विलक्षण.

दृष्टांत सांगावे माउलींनीच. अकराव्या अध्यायात भगवंतानी अर्जुनाला विश्वरूप दाखवले. ते अद्भुत रूप पाहून आनंदाने अर्जुनाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्या अर्जुनाच्या स्थितीचे वर्णन करताना माउली लिहितात -

वार्षिये प्रथमदशे। वोहळल्या शैलांचे सर्वांग जैसे।
विरुढे कोमलांकुरी तैसे। रोमांच जाहले।।अध्याय ११-२४७

म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला पर्वताच्या सर्वांगावरून पाणी वाहून गेल्यावर जसे पर्वताच्या सर्वांगावर अगदी कोमल व छोटं गवत उगवतं तसे अर्जुनाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. केवढी ही हृदयंगम कल्पना.

ज्ञानेश्वरीतील अहिंसेचे वर्णन अतिशय सुंदर आहे. त्या वर्णनाचे वर्णन शब्दात होऊच शकत नाही. उदाहरण म्हणून एकच ओवी लिहिते.

पुढां स्नेह पाझरे। माघा चालती अक्षरे।
शब्द पाठी अवतरे। कृपा आधी।। अध्याय १३-२६३

म्हणजे तो बोलत असता त्याच्या तोंडातून अक्षरे बाहेर पडण्याच्या अगोदर त्याच्या तोंडावर स्नेहभाव प्रगट झालेला दिसतो. अगोदर त्याच्या चित्रात दया प्रगट होते. नंतर कृपेने भरलेले शब्द मुखावाटे बाहेर पडतात. ज्ञानेश्वरीत फक्त अध्यात्माचेच विवरण आहे असे नाही तर जगावे कसे हेही आहे. एवढेच काय; मृत्यू कसा यावा हे पण आहे. चातुर्वर्ण व्यवस्थेचे वर्णन आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग आहे. भूगोल आहे. गुरुत्वाकर्षण आहे. आहारशास्त्र (सध्याच्या भाषेत डाएट) आहे.

ज्ञानेश्वरीत अभ्यासयोग आहे. ज्ञानेश्वरीत मानसशास्त्र आहे. आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ज्ञानेश्वरीतील गुरुभक्ती, सद्गुरूचं वर्णन करताना तर माउलींच्या शब्दांना बहार येतो. माउली म्हणतात 'हे प्रभो! आपल्या उपयोगी पडणारी जितकी उपकरणे, वस्तू आहेत तितक्या सर्वांची रूपे मी एकट्याने धारण करावीत. सर्व प्रकारची सेवा मी एकट्यानेच करीन. हे झालं देह असेपर्यंत. पण माउली म्हणतात,'देह पडल्यानंतर या शरीराची माती पृथ्वीच्या त्या भागात मिळवीन की ज्या ठिकाणी श्रीगुरूंचे पूजनीय श्रीचरण उभे रहातील.

इथे शरीरींची माती। मेळवीन तिथे सिती।
जेथ श्रीचरण उभे हाती। श्रीगुरूंचे।। अध्याय१३-४३२

ही गुरुभक्तीची उत्कट परमोच्चस्थिती, ज्ञानेश्वरीत अनुभवायला मिळते.

मला माझा स्वतःचा अनुभव आहे. मी माझ्या संसारातील अनेक संकटांचा सामना करू शकले ते फक्त माझ्या ज्ञानेश्वरी वाचनामुळेच. आज मी खूप समाधानी आहे. पण आजही माझ्यासाठी माझी ज्ञानेश्वरी माउलीच सर्वकाही आहे.

मला तर असं वाटतं की, जगात आज प्रत्येकाला काही ना काही मानसिक तणाव आहे. त्या तणावाखाली विद्यार्थी, तरुण, प्रौढ अशा अनेक वयाची लोकं आत्महत्या करतात. परमेश्वरानं दिलेले हे सुंदर जीवन नष्ट करतात. त्यासाठी जगातल्या प्रत्येकानं जीवन जगण्याची कला म्हणून ज्ञानेश्वरी वाचावी आणि आपलं आयुष्य सुखी समाधानी करावं

न्यून ते पुरते। अधिक ते सरते
करुनी घेयावे हे तुमते। विनवितु असे

**- भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी**

•••

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था
(भाग–८)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

**''मयमतम्'' अध्याय दहावा**

स्वस्तिकमुदितं ग्रामे यथा तथा स्वस्तिकं विद्यात् ।।६०।।

जर नगराचा आकार स्वस्तिकासारखा असेल तर रस्त्यांचे नियोजनही ''स्वस्तिक'' आकाराप्रमाणे करावे. (कोठेही कोपरे असू नयेत)

प्रागुत्तरमार्गा षट् षड्भीष्टास्तु तद्वाहये ।।६०१/२

अशा प्रकारच्या ''स्वस्तिक'' नगरांत सहा रस्ते पूर्वेकडे आणि सहा रस्ते उत्तरेकडे – (यांत सहा नगरांतील रस्ते आणि सहा बाहेरचे रस्ते असा ध्वन्यर्थ–) असावेत असे जाणकारांचे मत आहे. ही रस्त्यांची योजना ''स्वस्तिक'' नगरासाठी आहे.

प्राचीनोदीचीनाश्चत्वारश्चैव मार्गाः स्युः ।।६१।।<br>
ब्राह्मावृतपथमेकं कुट्मिमार्गाः त्रयः प्राच्याम् ।<br>
एतद्भकमुदितं नाम्ना नगरादिविन्यासम् ।।

जर मंदिर (किंवा ब्रह्मपीठ) मध्यभागी असेल आणि चार रस्ते पूर्व पश्चिम आणि चार रस्ते दक्षिणोत्तर असतील आणि एक रस्त्यामध्ये असलेल्या ब्रह्मपीठाला किंवा मंदिराला पूर्णपणे वळसा घालणारा असेल आणि तीन रस्ते पूर्वेकडे जाण्यासाठी योजिले असतील तर अशा नियोजित नगराला ''भद्रक'' असे संबोधले जाते.

''प्राङ्मुखमार्गाः पञ्चैवोत्तरमार्गास्तथैव स्युः।<br>
बहुकुट्मिसंयुक्तं भद्रमुखं नाम वस्तु स्यात् ।।

पाच रस्ते पूर्वेकडे आणि पाच रस्ते उत्तरेकडे जाणारे असतील आणि हे सर्व रस्ते चुनखडी–गोटे वापरून पक्के केले असतील तर अशी योजना असलेल्या नगराला ''भद्रमुख'' असे मानले जाते.

प्राचीनास्तु षडेवैवोत्तरमार्गास्तथैव स्युः ।<br>
यद् बहुकुट्मिसंयुक्तं तद् भद्रकल्याणम् ।।६४।।

ज्या नगरांत सहा रस्ते पूर्वेकडून आणि सहा रस्ते उत्तरेकडून योजिले आहेत आणि ज्या नगरांतील सर्व रस्ते चुनखडी–दगड–गोटे यांच्या मिश्रणाने पक्के केले आहेत, त्या प्रकारच्या नियोजित नगराला ''भद्रकल्याण'' असे संबोधले जाते.

पूर्वापरमुखमार्गाः सप्तैवोदङ्मुखाश्च तथा ।<br>
शेषं प्रागिव सर्वं विन्यासं तन्महाभद्रम् ।।६५।।

ज्या नगरांत सात रस्ते पूर्वेकडून पश्चिमेकडे जात असतील आणि सात रस्ते उत्तरेकडून येत असतील आणि असे रस्ते चुनखडी–दगड–गोटे मिश्रणांनी पक्के केले असतील तर अशा प्रकारच्या नगरांना ''महाभद्र'' असे संबोधण्यात येते.

अष्टौ पूर्वामुखमागाश्चाष्टवुदगग्वक्त्राः ।<br>
द्वादश मार्गोपेतं बव्हर्गल कुट्मिनैर्युक्तम् ।।६६।।<br>
यत् तद्वस्तु सुभद्रं नाम्ना विन्यासमुद्दिष्टम् ।

पूर्वेकडून पश्चिमेकडे (ज्या नगरांत) जाणारे आठ रस्ते असतील आणि आठ रस्ते उत्तरेकडून येणारे असतील

आणि बारा मार्गिका आणि (छोटे रस्ते) या सर्व रस्त्यांची रचना (चुनखडी-गोटे वापरून) दणकट केली असेल तर अशा प्रकारच्या ग्रामरचनेला 'सुभद्र' असे संबोधले जाते.

नवनवमार्गाश्चेते प्राचीन्याप्युदीचीनाः
द्वारोपद्वारयुक्तं कुट्टिमार्गार्गलैर्युक्तम् ।
राजगृहोपेतं यन्नगरं नाम्ना नयाङ्ग स्यात् ।।६८।।

(ज्या ग्रामांत) नऊ रस्ते पूर्वेकडे आणि नऊ रस्ते उत्तरेकडे जाणारे असतील आणि अशा (नगरांतील) या रस्त्यांना महाद्वार आणि उपमहाद्वारे (महाद्वार-मुख्य प्रवेशाला आणि उपमहाद्वार रस्त्याच्या मध्ये एकारे उपद्वार आवश्यक भासल्यास) आणि जेथील रस्ते पक्के आहेत आणि वेगमर्यादा नियंत्रित करण्यासाठी मध्येच काही वेगनियंत्रण पट्टे तयार केले आहेत आणि ज्या नगरांत राजगृह (राजाचे निवासस्थान पण) आहे, त्या नगराला जयांग असे संबोधले जाते.

प्राचीना दशदशमार्गाश्चोत्तरमार्गास्तथैव स्युः ।
नृपमन्दिरयुक्तं युक्त्यानेकार्गलोपेतम् ।।६९।।
बहुकुट्टिमसंयुक्तं विजयं नाम्ना वरैः प्रोक्तम् ।।६९१/२।।

(ज्या नगरांत) दहा रस्ते पूर्वेकडून आणि दहा रस्ते उत्तरेकडून योजिले आहेत आणि ज्या नगरांत राजनिवास असून अनेक लहान रस्ते वेगनियंत्रक पट्ट्यांनी युक्त असे (संरक्षणासाठी) योजिले आहेत अशा नगराला ''विजय'' असे नाव तज्ज्ञ व्यक्तींनी सुचवले आहे.

प्राचीनास्त्वेकादशमार्गा रुद्र उद्वीचीनाः ।।७०।।
ब्रह्मांशादपरांशो यदभीष्टं तत्र नृपवासम् ।
तन्मुखतोऽदग्रं महाडंगणकं स्यादिष्टभागे तु ।।७१।।
तत्रान्तःपुरवासे शेषं सर्वमुन्नयम् ।
तत्प्रागुद्गतमार्गा सा कथिता राजवीथिति ।।७२।।

वरील नगरांतच राणी महाल आणि राजपरिवारांतील इतर सदस्यांची निवासस्थाने असतील आणि एक रस्ता पूर्वेकडून उत्तरेकडे जात असेल, तर तो ''राजमार्ग'' समजला जातो. तसेच याच नगरांत अकरा रस्ते पूर्वे दिशेकडून निघतात, अकरा रस्ते उत्तरेकडून निघतात आणि मध्यभागांत असलेल्या मंदिराकडून राजप्रासादाकडे आणि राजप्रासादासमोरच्या प्रशस्त प्रांगणाकडे जाणारा रस्ताही राजमार्ग समजला जातो.

मार्गच्छेदं न इष्टं पदमध्ये चत्वरं न स्यात् ।
शेषं युक्तानुयुक्तं सम्यग्योज्यं नृपेच्छया ।।७६।। (तज्ज्ञैः)

रस्त्याच्या मध्यभागी कसलीही रचना (व्यासपीठ वगैरे) चबुतरा वगैरे रचना (रस्त्यामध्ये कोणताही अडथळा सरळ जाण्यासाठी असू नये) नसावी. परंतु काही रचना करणे आवश्यकच आहे असे वाटल्यास त्या रचनेच्या निर्मितीबद्दल राजाने तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. अशीच योजना मध्यम किंवा कमी महत्त्वाच्या मार्गावर पण केली जावी.

**समराङगणसूत्रधार**

'समरांगणसूत्रधार' या ग्रंथाची रचना 'परमार' कुळांतील 'राजा भोज' याने केली असे मानले जाते. 'राजा भोज' हा 'मालवा' प्रदेशाची राजधानी 'धारानगरी' इथून राज्यकारभार पहात असे. ग्रंथरचनेचा काळ साधारणतः ११०० इ.स. मधील मानला जातो.

क्रमशः

**- मधुकर गजानन दातार**

•••

विश्वास ठेवा देवावर. जे नशिबात लिहिलेले ते तर मिळणारच. पण विश्वास ठेवा स्व:च्या मेहनतीवर, काय सांगावे; देव तेच लिहिल जे तुम्हाला हवं आहे!

# अडचणीत रशिया, संधी भारताला

*रशियाचे पंतप्रधान ब्लादीमिर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील २० वी शिखर परिषद नुकतीच रशियात संपन्न झाली. ही परिषद दरवर्षी होत असली तरी यंदाच्या परिषदेला बदललेल्या आंतरराष्ट्रीय समीकरणांची पार्श्वभूमी होती यावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख – संपादक*



रशियाचे पंतप्रधान ब्लादीमिर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील २० वी शिखर परिषद नुकतीच रशियात संपन्न झाली. ही परिषद दरवर्षी होत असली तरी यंदाच्या परिषदेला बदललेल्या आंतरराष्ट्रीय समीकरणांची पार्श्वभूमी होती. भारताने नुकतेच जम्मू आणि काश्मीरच्या पुनर्रचनेबाबत घेतलेल्या निर्णयाला रशियाने दिलेला पाठिंबा, अमेरिका चीन मधील व्यापार युद्ध आणि आंतरराष्ट्रीय अर्थकारणावर त्याचा होणारा परिणाम, भारत पाकिस्तान मधील युद्ध सदृश्य परिस्थिती, भारताचे चीन बरोबर ताणले गेलेले संबन्ध, दुसरीकडे रशियावर अमेरिका आणि संपूर्ण युरोपने आर्थिक निर्बंध लादले आहेत आणि त्यामुळे रशिया प्रचंड मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. रशियातून युरोपमध्ये होणारी निर्यात पूर्णपणाने थांबली आहे. अशा परिस्थितीत रशिया सध्या बाजारपेठांच्या शोधात आहे. तसेच भविष्यात शीतयुद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास रशियाला भारताच्या मदतीची गरज भासणार आहे. त्यामुळेच भारताबरोबरचे व्यापारी आणि सामरिक संबंध वाढवण्यासाठी रशिया प्रयत्नशील आहे. साहजिकच त्यामुळे व्यापारादरम्यान भारताची सौदेबाजीची क्षमता वाढलेली आहे. याचा लाभ भारताने करून घेणे आवश्यक आहे.

गेल्या पाच वर्षात पंतप्रधान मोदी रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना २० वेळा भेटले आहेत! यावरून दोन्ही देशांमध्ये घनिष्ट होत असलेल्या संबंधांची जाणीव होते. असे असले तरी अलीकडच्या काळात भारताची अमेरिकेबरोबर वाढती जवळीक आणि रशियाचे पाकिस्तान बरोबर सुधारत जाणारे संबंध यामुळे भारताला रशिया बरोबरच्या संबंधात सामरिक समतोल साधणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने मोदींच्या रशिया दौऱ्याकडे पाहिले पाहिजे. या भेटी दरम्यान ऊर्जा, कॉंनेक्टिव्हिटी, लष्करी उपकरणांचे सुटे भाग पुरविणे व त्याचे उत्पादन याविषयी करार झाले. तसेच भारताने पाहिल्यांदाच रशियाच्या अति पूर्व भागात आर्थिक गुंतवणूक करण्याचे मान्य केले .

### भारत रशिया शीत युद्धोत्तर संबन्ध

शीतयुद्धाच्या काळामध्ये रशियाचे म्हणजे त्यावेळच्या सोव्हिएत युनियनचे आणि भारताचे संबंध खूप चांगले होते; परंतु १९९१ ते १९९६ या काळात दोघांचे संबंध थंडावलेल्या स्थितीत होते; म्हणजे त्यामध्ये

तणाव निर्माण झाला नसला तरी संबंध सुधारण्याच्या दृष्टीने काहीही पावले उचलली गेलेली नव्हती. याचे कारण रशिया हा आर्थिक कारणांमुळे युरोप आणि अमेरिकेकडे वळला होता. पण नंतर अमेरिका आणि युरोपकडून अपेक्षित आर्थिक मदत वा लाभ होत नसल्याचे लक्षात आल्यामुळे रशियाची निराशा झाली. त्यातूनच २००० पासून रशिया पुन्हा भारताकडे वळला आणि दोन्ही देशांमध्ये पुन्हा एकदा मैत्रीचे एक नवे पर्व सुरू झाले. त्यातूनच अटलबिहारी वाजपेयींच्या काळापासून दोन्ही देशांच्या पंतप्रधानांदरम्यान दरवर्षी शिखर परिषदा सुरू झाल्या.

**रशिया आर्थिक अडचणीत**

भारत आणि रशिया यांच्यातील २० वी शिखर परिषद नुकतीच झाली. मोदी –पुतीन भेट अशा वेळी झाली जेव्हा रशिया हा अत्यंत आर्थिक अडचणीत सापडलेला आहे.

**युरोपच्या निर्बंधांमुळे रशिया अडचणीत**

याचे कारण युक्रेनच्या प्रश्नावरून अमेरिका आणि रशिया यांच्यातील संबंध कमालीचे तणावपूर्ण बनलेले आहेत. युक्रेनचा भाग असलेल्या क्रामियामध्ये आपल्या दबावाचा वापर करून सार्वमत घेतले आणि आपल्या लष्कराच्या जोरावर रशियाने क्रामियाचे एकीकरण करून घेतले. सध्या युक्रेनमध्ये रशियाच्या लष्कराच्या मदतीने यादवीयुद्ध सुरू आहे. या यादवी युद्धाचा एक भाग म्हणून मध्यंतरी मलेशियन एअरलाईन्सचे एक विमान पाडण्यात आले होते .या सर्व प्रकारामुळे अमेरिका आणि युरोप यांनी एकत्रितपणे रशियावर आर्थिक निर्बंध लादलेले आहेत. याचा खूप मोठा आर्थिक फटका सध्या रशियाला सोसावा लागत आहे. याचे कारण रशिया हा नैसर्गिक वायू आणि तेल यांची निर्यात करणारा जगातील एक मोठा देश आहे. रशियाकडून संपूर्ण युरोपला मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वायू आणि तेलाचा पुरवठा केला जातो. रशियाचे फार मोठे व्यापारी हितसंबंध युरोपमध्ये गुंतलेले आहेत. आर्थिक निर्बंध लादल्यानंतर युरोपने रशियाकडून नैसर्गिक वायू आणि तेलाची आयात करणे पूर्णपणे थांबवलेले आहे. तसेच रशियामध्ये असणारे बँकिंग क्षेत्रासारखे सेवाक्षेत्रांचे उद्योगही युरोपने काढून घेतलेले आहेत. याचा रशियाच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाला आहे. रशियाची अर्थव्यवस्था कोसळली आहे. रुबल या रशियाच्या चलनाचे मूल्यही घटले आहे. तसेच, रशियातून फार मोठ्या प्रमाणावर भांडवल बाहेर जाऊ लागले आहे.

**चीन, पाकिस्तान नंतर आता भारताच्या बाजारपेठेवर लक्ष**

आर्थिक पातळीवरील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमुळे रशिया सध्या नव्या ग्राहक देशाच्या, बाजारपेठेच्या शोधात आहे. त्या अंतर्गतच रशियाने काही वर्षांपूर्वी चीनबरोबर ४०० अब्ज डॉलर्सचा नैसर्गिक वायू पुरवठा करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण करार केला. दुसरीकडे रशिया सध्या संरक्षणक्षेत्रातील नव्या करारांच्या शोधात आहे. याचाच एक भाग म्हणून रशियाने काही लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स यासंदर्भात पाकिस्तानसोबत संरक्षण करार करण्यास सुरुवात केलेली आहे. यानंतर आता ते भारताकडेही एक मोठी बाजारपेठ म्हणून पहात आहेत.

**भारत–रशिया सामरिक संबंध**

भारतासोबत रशियाचे आर्थिक आणि सामरिक हितसंबंध गुंतलेले आहेत. रशिया हा जगातील एकमेव असा देश आहे ज्याच्याशी भारताने संरक्षण युती केलेली होती. स्वतंत्र भारताच्या इतिहासात भारताने कोणाशीही अशा प्रकारची सामूहिक संरक्षण युती (कॉलेक्टिव्ह सिक्युरिटी अलायन्स) केलेली नव्हती. पण १९७१

मध्ये ती रशियाशी केली. दुसरी गोष्ट म्हणजे संपूर्ण शीतयुद्धाच्या काळात काश्मीरच्या मुद्द्याबाबत रशियाने भारताला समर्थन दिलेले आहे. ज्यावेळी अमेरिका भारताला अडचणीत आणू पहात होता, त्यावेळी रशिया भारताच्या मदतीला आलेला आहे. तसेच, रशियाने भारताच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचा सहभाग घेतलेला आहे. तसेच, भारताच्या संरक्षण क्षेत्राच्या विकासामध्येही रशियाने मोठे योगदान दिलेले आहे. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील एकूण आयातीपैकी ७० टक्के आयात आजही रशियाकडून होते. संरक्षण क्षेत्रामधील संवेदनशील तंत्रज्ञानही रशियाने भारताला हस्तांतरित केलेले आहे. उदाहरणार्थ, नुकतेच आपण रशियाच्या मदतीने अरिहंत आण्विक क्पाणबुडी विकसित केले आहे. अशा प्रकारच्या हस्तांतरणासाठी अद्याप अमेरिकाही तयार नाही. पण रशियाने तयारी दर्शवली हे विशेष आहे. नुकतेच भारताने रशियाकडून ४०० ही पाच अब्ज डॉलर्स किमतीची अँटी बॉलिस्टिक मिसाईल यंत्रणा विकत घेण्याचा निर्णय घेतला आहे .

**संरक्षण क्षेत्रातील व्यापार वाढवण्यासाठी रशिया आग्रही**

रशिया हा इतका जुना मित्र असूनही, दोघांमधील संबंध सुदृढ असूनही दोन्ही देशांमधील व्यापार अवघा २० अब्ज डॉलर्सचा आहे. त्यातही संरक्षण क्षेत्राचा हिस्सा अधिक आहे. इतर बाबतींतील व्यापार अत्यल्प आहे. आता भारत संरक्षण क्षेत्रातील आयातीसाठीही इतर देशांकडे वळू लागला आहे. भारत रशियावरील आपले परावलंबित्त्व कमी करू लागला आहे. याचे कारण रशियाकडून मिळणारे संरक्षण तंत्रज्ञान हे महागडे ठरू लागले आहे. तसेच ते मिळण्यामध्ये प्रचंड विलंब होत आहे. याबाबतचे उदाहरण म्हणजे अ‍ॅडमिरल गोष्काव ही विमानवाहू नौका भारताला मिळण्यास जवळपास १० वर्षे उशीर झाला. परिणामी, त्याची किंमत वाढली आणि भारताला अधिक पैसा खर्च करावा लागला. भारताला नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे भारत आता इस्राईल, फ्रान्स आणि अमेरिका या तीन राष्ट्रांकडून शस्त्रास्त्रे आणि संरक्षण साहित्य आयात करत आहे. भारतासोबतच्या संरक्षण साहित्य व्यापारामुळे रशियाला फार मोठा पैसा मिळत होता. पण भारताने रशियावरील या बाबतचे परावलंबित्त्व कमी केल्याने रशिया घाबरला आहे.

**अणुऊर्जेच्या क्षेत्रातील व्यापार वाढणार**

दुसरा मुद्दा म्हणजे, भारत आणि रशियामध्ये आणखी एक क्षेत्र विकसित होत आहे ते म्हणजे अणुऊर्जेचे. भारताला युरेनियम हे अणुइंधन पुरवणारा रशिया हा एक महत्त्वाचा देश होता. १९९८ मध्ये भारताने अणुपरीक्षण केल्यानंतर रशियाने हे अणुइंधन देणे थांबवले होते. पण नंतर रशियाने युरेनियम देण्यास सुरुवात केली होती. आता रशियाच्या सहकार्याने भारत आगामी काळात म्हणजे २०२० पर्यंत जवळपास १७ अणुभट्ट्या उभारणार आहे. या संदर्भातील भारत–रशियाचा व्यापार हा सुमारे ४५ अब्ज डॉलर्सचा असणार आहे. सध्या रशियाच्या मदतीने तमिळनाडूतील कुडानकुलम येथे दोन अणुप्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. त्यातून वीजनिर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. तेथेच आता आणखी दोन प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

●●●

# अर्थकारण आणि अमृता प्रीतम

*ज्येष्ठ साहित्यिक अमृता प्रीतम यांची यावर्षी जन्मशताब्दी आहे. या निमित्ताने अर्थकारण आणि अमृता प्रीतम या विषयावर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री चंद्रशेखर टिळक यांचा लेख- संपादक*

हो.

मी शीर्षक बरोबर दिले आहे.

माझ्या लिहिण्यात आणि तुमच्या वाचण्यात काहीही चूक झालेली नाही ....

अर्थकारण आणि अमृता प्रीतम असंच लेखाचे नाव आहे.

होय.

त्याच अमृता प्रीतम.

ज्येष्ठ साहित्यिक.

ज्यांची यावर्षी जन्मशताब्दी आहे ...

ज्या ३१ ऑक्टोबरला निधन पावल्या ...

हो.

मला माहिती आहे की, त्या साहित्यिक होत्या आणि आहेतच; त्या अर्थतज्ज्ञ नव्हत्या.

पण काल त्यांच्या कथा वाचत असताना अनेकदा मला असं वाटतं होतं की, ती वाक्ये, ते संवाद केवळ पुस्तकी नाहीत. अनुभवांवर आधारीत अशा त्या शब्दरचनांना साहित्यिक मूल्य तर आहेच; पण त्याचबरोबर त्या अर्थकारणालाही तितक्याच लागू पडतात.

असं लिहिताना अमृता प्रीतम यांना कदाचित ते अर्थकारणाला लागू पडावे असं अभिप्रेत नसेलही ....

पण

एक वाचक म्हणून मला तसं नक्कीच वाटले ... आणि ते फक्त त्या क्षणालाच असणार नाही हे नक्की!

आणि असे वाटणे फ़क्त सध्याच्या आर्थिक मंदीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर नाही हेही तितकेच निश्चितच!

आता त्यांच्या 'परदेसी' या कथेतले हे वाक्य बघा ना ..

'आपल्या कोणत्याही देशाचा साचा अजूनही असा नाही बनलेला की तो माणसाला जगण्याचा हक्क देईल आणि जगण्याचा अभिमानही देईल.

एखाद्या आर्थिक धोरणाचे किंवा संपूर्ण अर्थकारणाचे घोषवाक्य असावे असं नाहीये का? '

विशेषतः वाक्याचा उत्तरार्ध .... 'माणसाला जगण्याचा हक्क देईल आणि जगण्याचा अभिमानही देईल.'

एखाद्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार - प्रमाणपत्र पाहणीसाठी एखाद्या संस्थेने Mission Statement म्हणून काही उद्दिष्ट स्वीकारावे तसं हा उत्तरार्ध राष्ट्रीय अर्थकारणाचे मिशन स्टेटमेन्ट असायला काय हरकत आहे?

तसं या ना त्या प्रमाणात ते असेलही ...असेही ....निदान कागदोपत्री तरी ....

ते प्रत्यक्षात कधीच उतरत नाही हीच तर खरी शोकांतिका आहे. त्यामुळे या वाक्याचा पूर्वार्ध या वाक्याच्या उत्तरार्धावर सतत मात करत राहातो ....

आपण परिस्थितीला शरण जाता कामा नये; परिस्थिती आपल्याला शरण गेली पाहिजे.

अगदी अमृता प्रीतम यांच्या या विधानातला पूर्वार्ध हा त्याच्या उत्तरार्धाचा परिणाम असावा असं वाटायला लागावे असा ....

खरं म्हणजे, ती त्याची पार्श्वभूमी किंवा कारणमीमांसा व्हायला हवी ना !

एक नागरिक म्हणून, 'हेची फळ काय मम तपाला' असंच म्हणायची वेळ का यावी? अगदी दरवेळी ? मी प्रामाणिकपणे कर भरत राहायचे आणि तो पैसा बुडितखाती बँकांना मिळत राहावा याला काय अर्थ आहे ? बँक बुडाली किंवा अडचणीत आली की मी कष्ट करून मिळवलेला माझा पैसा अडकून पडतो आणि मी दुसऱ्याच्या मर्जीवर अवलंबून राहातो; त्या पैशांतून कर्ज घेतलेला मात्र स्वतःच्या मर्जीने जगत परागंदा होतो ...आणि त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याच्या गावगप्पा टिपू सुलतानाची तलवार किंवा कोहिनूर हिरा परत आणण्याच्या बातम्यांसारखे ऐकत राहातो . कधी कधी तर दावूदला खेचत – फरफटत घेउन येऊ असं सुद्धा! कदाचित नेमके कोणाकोणाला स्वप्नं दाखवत असतो हे तर साक्षात परमेश्वरही सांगू शकणार नाही!

दरवेळी असाच प्रसंग असतो असं नाही. पण अनेकदा, 'आर्थिक धोरण आणि त्याची परिणामकारकता व इच्छित किंवा अपेक्षित दिशेने वाटचाल' ह्या चर्चेच्या किंवा वादाच्या गोष्टी ठरतात; प्रत्यक्ष अनुभवाच्या ठरत नाहीत.

आणि अशावेळी अमृता प्रीतम यांचे हे विधान आठवत राहील हे नक्कीच ! ! !

कोणत्याही अर्थकारणाच्या कपाळावरची भळभळणारी जखम ..... अश्वत्थामाही चिरंजीव आणि त्याची जखमही .... तुमच्या – माझ्या सारख्या सर्वसामान्य नागरिकांना छळणाऱ्या अपेक्षाभंगासारखी!

ही भावना एकदा मनात मूळ धरायला लागली की अमृता प्रीतम यांचेच त्यांच्या 'एक लडकी; एक प्याली' या कथेतील सगळ्या प्रदेशांच्या दुःखाची भाषा एकच असते हे वाक्य आपसूकच मनात डोकावायला लागते. हे दुःख किंवा हे विधान दिलासा समजायचे की सबब? हे मात्र कळत नाही.

१९७० च्या दशकात आपल्या माजी पंतप्रधान मा . कै . श्रीमती इंदिरा गांधींनी त्यांच्या एका भाषणात सांगितले होतेच की, भ्रष्टाचार ही जागतिक बाब आहे.

आजकाल तर हे वाक्य मला वारंवार आठवत राहील. कारण सध्या आपल्या देशात आर्थिक मंदीची चर्चा सुरू आहे. कोणी त्याची तीव्रता आणि सर्वंकषता उच्चरवाने मांडत आहे. अगदी अशा थाटात की, जणू काही आपली राष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणजे अमावस्येची अमावस्या आहे . सध्याच्या राजकीय – सामाजिक – समाजमाध्यम जमान्यात त्याचा प्रतिवाद झाल्यावाचून राहात नाही . मग तो प्रतिवादही इतका टोकाला जातो की, जणू काही आपल्या देशाचे प्रचलित राजकारण म्हणजे पौर्णिमेची पौर्णिमा आहे. आणि मग शांतपणे कधीतरी मधेच कोणीतरी सांगायला लागते की, मुळातच मंदी नाहीच; आणि असलीच तर मंदी काही फ़क्त आपल्याच देशात नाही. आणि असं आम्ही म्हणत नाही तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ( इंटरनॅशनल मोनेटरी फंड किंवा आयएमएफ ) अध्यक्षानीच नुकतेच सांगितले आहे की, जवळजवळ ९० टक्के जगात मंदी आहे .

हे ऐकणं म्हणजे मी अडचणीत आहे याचे वाईट वाटून घेण्यापेक्षा इतरही अनेकजण अडचणीतच आहेत याचा आनंद वाटून घेण्यासारखे आहे! आणि हा अनुभव अनेकदा अनेक ठिकाणी येतो म्हणून निर्ढावलेले होत वागण्याचा प्रयत्न करावा असं तर त्यातून सुचवायचे नसते ना ! !

---

अहंकार हा तपःसाधनेचा महान शत्रू आहे.

याला नेमके कशाचे खाजगीकरण – उदारीकरण– जागतिकीकरण म्हणायचे? धोरणाचे की धोरणाच्या अपयशाचे की आर्थिक अनुभवाचे?

अशी चर्चा हा दिलासा नाही याची बोच तीव्र व्हायला लागली ना, की दिलासा हा खोटा वायदा तर नव्हता ना! अशी पापशंका आपली परवानगी न मागता आपल्यात शिरते आणि अमृता प्रीतम यांच्या 'सतलतीया' या कथेतील, 'दिलासा आणि खोटे वायदे यातला फरक आता समजू लागला आहे' हे वाक्य डोक्यात घुमायला लागते.

ही परिस्थिती फार अवघड असते. स्वतःचा स्वतःलाच संताप यावी अशी! हा संताप अगदी वांझोटा आहे ही जाणीव पार अगतिक करते. अमृता प्रीतम यांच्या या कथेचे नाव आहे 'सतलतीया' याचा अर्थ 'सात लाथा (मारणे)' असा आहे. त्या कथेची नायिका तिची फसवणूक करणाऱ्याला, तिच्यावर अन्याय करणाऱ्याला सूड म्हणून – शिक्षा म्हणून सात लाथा मारते अशी ती कथा आहे. आपण यातले काहीही करू न शकण्याच्या अवस्थेत का आणि कसे आलो हा प्रश्न मात्र आपल्याला 'सात नाही तर सत्तर लाथा' सतत मारत राहातो! आणि व्यक्ती म्हणूनही आणि साहित्यिक म्हणूनही प्रभावीपणे स्वतःला उभं करणारी आणि उभं ठेवणारी अमृता प्रीतम एका वेगळ्याच रूपात आपल्या मनाचा कब्जा घेते ...कधीही न सोडण्यासाठी ...जणू काही आपण वेगळ्याच अर्थाने ईमरोज झालेलो असतो ....ईमरोज नव्हते का म्हणाले .... 'अमृताने शरीराचा त्याग केला आहे. माझा नाही. माझ्या सहवासाचा त्याग तर नाहीच नाही.'

असं का होते याचा विचार करायला लागले ना की यापुढे मला अमृता प्रीतम यांच्या 'दो खिडकिया' या कथेतील 'हुकूम नाही बदलले; फक्त हुकूम देणारी तोंडं बदलली आहेत' हे वाक्य सतत आठवत राहील.

अर्थकारणात सातत्य अपेक्षित असते. पण असं सातत्य आपल्याकडे निश्चितच नव्हे. आपल्या देशात आर्थिक सुधारणाचा कार्यक्रम सुरू होउन आता ३० वर्ष पूर्णं होत आली आहेत. या काळात आपल्या देशाने अनेक राजकीय रंगसंगतींची अनेक सरकारे बघितली. या काळात आपल्या देशातील बहुतेक सर्वच राजकीय पक्ष या ना त्या स्वरूपात, या ना त्या काळात सरकारात सामील होते . तरीही या ३० वर्षांच्या काळात आपल्या देशाच्या आर्थिक धोरणाने फारसे घूमजाव (यू टर्न) पाहिलेला नाही.

(काही प्रमाणात डॉ. मनमोहनसिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कालखंडातला प्रणब मुखर्जी यांच्या अर्थमंत्रीपदाचा कालखंड हा अपवाद ठरावा ! )

या ३० वर्षांच्या काळात आपल्या राष्ट्रीय अर्थकारणाने आर्थिक विकासाच्या दराने दोन टक्क्यांवरून सध्याच्या पाच –साडेपाच टक्क्यांपर्यन्त, व्हाया साडेनऊ टक्के असा प्रवास जरूर केला. कारण या ३० वर्षांच्या काळात सरकारी धोरणात प्राधान्यात (प्रायोरिटी) बदल जरूर झाला, योजनांच्या नावात बदल झाला; पण धोरणांच्या दिशेत मात्र बदल झाला नाही. याचे कौतुक जरूर आहे. पण सर्वसामान्य नागरिक म्हणून त्या त्या क्षणाला दैनंदिन जीवनात या ना त्या उणीवा इतक्या भेडसावत राहातात की, या ढोबळ चित्रातला बदल तसा दुर्लक्षितच राहातो. ही मानसिकता अनेकदा बंडखोरी जरी नाही तरी उदासीनता नक्कीच निर्माण करते ....ही उदासीनता तुम्हांला तटस्थ राहू देत नाही.

तटस्थ न राहाणे हाच तर अमृता प्रीतम यांच्या साहित्याचा श्वास आहे. वेळप्रसंगी तात्कालिक रीतीरिवाज धुडकावून संवेदनशीलतेने आयुष्याला सामोरे जाणे याचेच तर नाव अमृता प्रीतम !

---

मोती होण्यासाठी जलबिंदूला आकाशातून आपला अधःपात करून घ्यावा लागतो.

पण अर्थकारणाचे भरीवपण जेव्हा आणि जसं जाणवेनासे होते ना (आर्थिक मंदीची चर्चा तो माहोल निर्माण करण्याच्या प्रक्रियेत असते) तेंव्हा आणि तसं अमृता प्रीतम यांच्या 'दो खिडकिया' या कथेतील 'खडखडाट शब्दांना असतो; अर्थाला नाही' हे वाक्य टोचायला लागते.

टाळतो म्हणूनही टाळता येत नाही ते त्या क्षणाला तरी ! कारण स्वत:शीच इतके खोटे वागता येत नाही ....व्यक्तीलाही आणि अर्थकारणालाही ....

कारण अशावेळी त्याच कथेतील अमृता प्रीतम यांचे, 'मी खोटे लेख लिहिते तेंव्हा घरी आल्यावर वाटते जणू काही मी परक्या पुरुषाबरोबर झोपून आली आहे!' हे वाक्य डोक्यात आणि मनात घर करून असते.

जागतिकीकरणाच्या आजच्या जमान्यात तर अर्थकारण आणि अमृता प्रीतमच्या कथा यांची अनोखी सांगड मनात फेर धरत असताना त्यांच्या 'खाली कनव्हास' या कथेतील लोक 'नेहमीच विशेषणावर प्रेम करतात; नामावर नाही' या वाक्याचे अनेक कंगोरे इंद्रधनुष्य फिके पाडत राहतात.

कारण त्रयस्थपणे अर्थकारणाचा विचार करताना, अनेक आर्थिक योजनांच्या अंमलबजावणीचा अनुभव आपल्यावर आपसूकच आदळत असताना यापुढे मला नेहमीच अमृता प्रीतम यांच्या 'परदेसी' कथेतील 'डोळे आहेत... अगदी विशाल आहेत.... पण त्यात नजर नाही.' हे वाक्य मला सतत आठवत राहील.

यात आपण इतके थकून जातो .... मानसिक, शारीरिक, बौद्धिक, भावनिक की आपल्या लक्षात यायला लागते की अर्थकारण आणि अमृता प्रीतम (परदेसी ही कथा) एकच शिकवत असतात की -

'आयुष्याकडे नेहमी मुकाट्याने पाहात राहायचे असते; आयुष्याला काहीही विचारायचे नसते!'

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९८२०२९२३७६

•••

---

(पृष्ठ क्र.१२ वरून - **राष्ट्रीय आयुर्वेद दिन (२५ ऑक्टो.२०१९**)

दिनचर्या, ऋतुचर्या, आहार व विहार नियमाचे पालन अनिवार्य आहे आणि माझ्या अनुभवानुसार ही आयुर्वेदाने दिलेली देणगी जगातील सर्वांचे स्वास्थ्यसंरक्षण, संवर्धन करण्यास सक्षम आहे.

मला वेळ नाही ही सबब न सांगता आरोग्यासाठी वेळ काढण्याचा संकल्प आजच्या शुभदिनी आपण करावा. आपण आपल्या कुटुंबीयांसह सुखी समाधानी वृतीने जगावे, ही धन्वंतरी चरणी प्रार्थना. सर्वाना दीपावलीच्या व राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या आरोग्यदायी शुभेच्छा...

**- डॉ. व्यंकट पु. धर्माधिकारी**
एम.डी.आयुर्वेद
सहाय्यक संचालक आयुष पुणे.
भ्रमणध्वनी : ९४०३८५६६०२
Email : venket.dharmadhikarigmail.com

•••

---

# सेंट पीटर्सबर्गची सफर

*खास 'दिशा'च्या वाचकांसाठी सेंट पीटर्सबर्गच्या नयनरम्य प्रवासाबद्दल संकेत कुलकर्णी, लंडन यांच्या डायरी मधील नोंदी लेखस्वरूपात फेसबुक वरील पोस्टच्या आधारे देत आहोत - संपादक*

**सेंट पीटर्सबर्ग: भाग १**

सांक्त पीटर्सबर्ग किंवा पेट्रोग्राड किंवा लेनिनग्राड किंवा पुन्हा सेंट पीटर्सबर्ग!




मॉस्कोआधी रशियाची राजधानी असलेलं हे शहर. दरवर्षी सुमारे १५ जून ते ७ जुलै सूर्यच न मावळणारं हे शहर. १९१७ मध्ये रशियन लाल राज्यक्रांतीची सुरुवात झालेलं शहर. दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीच्या वेढ्यात वीज किंवा पाण्याशिवाय सतत ९०० दिवस काढून तरीही हार न मानणारं हे ते शहर! जर्मन सैन्य निघून गेल्यानंतर लगेच झालेले उंदीर मारण्यासाठी तब्बल ५००० मांजरी आयात करून त्यापैकी दोन मांजरांचे (येलिसी आणि व्हासिलिया ही त्यांची नावं!) पुतळे उभे करून त्यांची आठवण ठेवणारं हे शहर! पुतीनकाकांचे जन्मगाव असणारं हे शहर. नेव्हा नदीच्या काठावर वसलेलं आणि कालव्यांवरून तब्बल ३४२ छोटेमोठे पूल असणारं हे शहर! फिनलंडच्या सीमेपासून फक्त १६० किलोमीटर्सवर असूनही युरोपीयन युनियनमध्ये नसणारं हे शहर!

सेंट पीटर्सबर्गबद्दल काय सांगू आणि किती सांगू असं झालंय मला. शनिवार रविवार अशक्य (माझ्या स्टँडर्डने!) चालणं झालेलं आहे. अशक्य म्हणजे सुमारे ३० किलोमीटर्स - होय पायी!! हे चालणं दोन ठिकाणांमधलं अंतर नाहीये - तर एकूण चालून बघितलेली म्युझियम्स - कॅथेड्रल्स - चर्चेस ह्यांच्यातलं आहे. सगळीकडे टॅक्सी घेऊन फिरलोय तरीही इतकं आहे. ह्यांवरून किती भटकलोय ह्याची कल्पना यावी.




अजून एक गोष्ट म्हणजे - सहसा किंवा उगाच फोटो न काढणाऱ्या माझ्यासारख्याने ह्या दोन दिवसात तब्बल ८००+ फोटो तरी नक्की काढलेत, इतक्या गोष्टी बघण्यासारख्या होत्या!

**सेंट पीटर्सबर्ग: भाग २**

सकाळचे ७:५५. आमची मॉस्कोवरून निघालेली ट्रेन अगदी राईट टाईम स्टेशनात आली. एक मिनिटही उशीर नाही. हॉटेलचं चेक इन तसंही सकाळी ११ शिवाय होणार नव्हतं. मग थोडंसं भटकायचं ठरवलं. सोबत माझा इंग्लिश मित्र - एलियट होताच (मी त्याच्या नावाचा केलेला शॉर्टफॉर्म 'एल'. कारण मी 'एलियट' म्हटलेलं बरेचदा मलाच 'इडियट' म्हटल्यासारखं वाटायचं. तो बिचारा कधी काही बोलला

नाही. असो!). सामान म्हणजे पाठीवर छोटीशी एक सॅक. त्यामुळे सामानाचं काय करायचं हा प्रश्नच नव्हता.

सेंट पीटर्सबर्गचा थोडासा इतिहास पाहू या. सतराव्या शतकात स्वीडनने रशियाचा उत्तरेचा बराचसा भाग जिंकून घेतला होता. त्याला नाव दिलं होतं इंगरमनलँड. रशियाचा बाल्टिक समुद्राचा मार्ग संपूर्ण बंदच झाला होता. रशियन राजांनी तो भाग जिंकायचा बराच प्रयत्न केला. यश कोणाला मिळालं नाही. शेवटी १७०३ च्या एप्रिलमध्ये रशियाच्या पहिल्या पीटर राजाला (ह्यालाच 'पीटर द ग्रेट' म्हणतात. मी फक्त 'पीटर' म्हणणार आहे.) थोडंसं यश मिळालं. न्येन्सकान्स नावाचा स्वीडिश किल्ला त्याने जिंकून घेतला. १ मे १७०३ रोजी त्याने त्याच्या सेनाधिकाऱ्यांबरोबर एक मिटींग घेतली. त्यात असं ठरलं की, न्येनकान्सला अजून बळकट करायच्या ऐवजी नेव्हा नदीच्या त्रिकोणी तीरावर नवीन ठाणं बांधायचं. पीटरने जेव्हा ती जागा बघितली तेव्हा तो तिच्या प्रेमातच पडला. ठाणं बांधायच्या ऐवजी तिथे एक शहरच उभारलं गेलं. सरळसोट रस्ते. भरपूर कालवे. उंच इमारती. सगळंच आलं. शहराला उत्तम संरक्षणही होतं. नदीच्या उजवीकडे पीटर-पॉल फोर्ट्रेस (किल्ला) तर डावीकडे डमिरल्टी बिल्डिंग. नदीत समोरच क्रॉनस्लॉत नावाचा जलदुर्ग. दक्षिणेला पीटरहॉफ, येकातेरीनहॉफ, आनेहॉफ, ओरानिएनबॉम, स्ट्रेल्ना, दुब्की, त्सारकोयेसेलो ह्या एकापेक्षा एक सुंदर इमारती.



१७१२ मध्ये पीटरने रशियाची राजधानी सेंट पीटर्सबर्गला हलवायची ठरवली. पीटरची इच्छा सेंट पीटर्सबर्गला दुसरं मस्टरडॅम बनवायची होती. तसेच कालवे. तशाच इमारती. तशीच चर्चेस. १७२४ मध्ये पीटरने इव्हान कोरोबॉव्ह नावाच्या त्याच्या स्थापत्यशास्त्रज्ञाला ह्याच कामासाठी हॉलंडला पाठवले होते. डच स्थापत्यशास्त्रज्ञ हर्मन व्हॉन बोल्सने बांधलेले पीटर-पॉल फोर्ट्रेस आणि डमिरल्टी बिल्डिंगचे आकार अजूनही डच धाटणीचेच आहेत.

१७१२ ते १७२८ आणि १७३२ ते १९१८ सेंट पीटर्सबर्ग रशियाची राजधानी होती. रशियन राज्यक्रांतीनंतर ती मॉस्को झाली. सेंट पीटर्सबर्गमध्ये मात्र अजूनही जुन्या इमारती दिमाखात उभ्या आहेत. स्टेशनसमोरच एक उंच मनोरा आहे. त्याचं नाव व्होस्तानिया स्क्वेअर. शब्दशः अर्थ 'क्रांती चौक'. १९०५ आणि १९१७ मधल्या रशियन राज्यक्रांत्या सेंट पीटर्सबर्गमध्येच झाल्या. त्यांच्या स्मरणार्थ १९१८ मध्ये हा मनोरा उभारण्यात आला. त्या जागी एक चर्च होते, पण ह्या 'क्रांतीचौका'साठी ते पाडून टाकण्यात आले.



ह्या क्रांतीचौकातून सेंट पीटर्सबर्गचा मुख्य रस्ता सुरू होतो. नेव्हेस्की प्रॉस्पेक्ट हे त्याचे नाव. शहराच्या मधोमध ६ कारलेन्सचा सरळसोट रस्ता आहे हा. सेंट पीटर्सबर्गची बऱ्यापैकी सगळी मुख्य आकर्षणं ह्याच्याच डाव्या-उजव्या बाजूला आहेत. आम्ही नेव्हेस्की प्रॉस्पेक्टवरून सरळ

चालत गेलो. वाटेत बरीच ठिकाणं दिसली. काही आत जाऊन बघितली. त्याविषयी नंतर बोलू.

**सेंट पीटर्सबर्ग: भाग ३**

नेव्हेस्की प्रॉस्पेक्टवरून आम्ही सरळ चालत निघालो. आभाळ भरलेलं होतं आणि हवेत जरासा गारवाही होता. ब्रेकफास्ट ट्रेनमध्येच झाला असल्याने भूक लागली आहे वगैरे कटकट नव्हती. सकाळी ८-८:१५ वाजता रस्त्यावर फारशी वर्दळही नव्हती. मी आणि एल गप्पा मारत निघालो होतो.

वाटेत आम्हाला एक नदी आणि तिच्यावर एक पूल लागला. ह्या नदीचे नाव फाँटान्का. पुलाचे नाव अनिच्कॉव्ह ब्रीज. पीटरच्या आज्ञेवरून कॅप्टन मिखाईल अनिच्कॉव्हच्या इंजिनीयरींग पलटणीने १७१५ मध्ये येथे पूल बनवला होता. त्याची आठवण म्हणून त्याचेच नाव पुलाला दिलेलं आहे. सध्याचा पूल १८४१-४२ मध्ये बनवलेला असून पुन्हा १९०६-०८ साली त्याचे पुनर्जिवीकरण करण्यात आले. पुलाच्या चारही कोपऱ्यांवर घोड्यांची ब्राँझची शिल्पं आहेत. प्रत्येक घोड्याला त्याच्यासोबतचा एक माणूस कह्यात ठेवायचा प्रयत्न करतोय असं दाखवलंय. माणसाने निसर्गावर कसा ताबा मिळवला हे त्यामधून त्याच्या निर्मात्याला - पीटर क्लॉडला - १८५१ मध्ये सुचवायचं होतं.

अनिच्कॉव्ह ब्रीजच्या एका बाजूला बेलोसेल्स्की-बेलोझेर्स्की पॅलेस लागला. हा पॅलेस १७४७ मध्ये बांधलेला आहे. २०१२ मध्ये येथे मोठी आग लागली होती. पण ती वेळेवर विझवल्याने काही फारसं नुकसान झालं नाहीये. सध्या येथे म्सुझिक कन्सर्टस किंवा नाटकं वगैरे होतात.

पुढे गेल्यावर विटा आणि काचांचं बांधकाम असणारं एलिसेयेव्ह एंपोरियम लागलं. १९०२ साली गॅब्रिएल बरानोव्होस्की नावाच्या वास्तुविशारदाने आर्टनुव्हो शैलीत बांधलेली ही इमारत बराच चर्चेचा विषय झाली होती. अशा शैलीत बांधलेल्या इमारतीही रशियात दुर्मीळ आहेत.



पुढे गेल्यावर ग्रेट गॉस्तिनीद्वहोर नावाची इमारत लागली. जगातल्या सर्वात जुन्या शॉपिंग मॉल्समध्ये ग्रेट गॉस्तिनीद्वहोरचा नंबर लागतो. १७५७ मध्ये ह्याच्या कामाची सुरुवात झाली. (तेव्हा आपल्याकडे पुण्यात नानासाहेब पेशवे राज्य करत होते आणि पानिपतही व्हायचं होतं!) तब्बल २८ वर्षांनंतर ह्याचं एकूण ५७०००० स्क्वेअरफूटचं बांधकाम एकदाचं संपलं. ह्यात एकूण १७८ दुकानं होती. अजूनही हा मॉल सुरू आहे.

अजून थोडं पुढे गेल्यावर सेंट पीटर्सबर्गचा सिटीहॉल लागतो. १७९९ मध्ये चालू झालेले ह्याचे काम १८०४ मध्ये संपले. वास्तुविशारद होता इटालीयन. गियाकोमो फेरारी हे त्याचं नाव. टॉवरवर दिसणारी घड्याळं १८८८ मध्ये बसवण्यात आली. आजही ती व्यवस्थित वेळ दाखवतात.

**सेंट पीटर्सबर्ग: भाग ४**

सिटी हॉलपासून पुढे निघाल्यावर आम्हाला अजून एक कॅनाल लागला. ग्रिबॉयेदोव्ह कॅनाल हे त्याचे नाव. कोपऱ्यावर एक वेगळीच इमारत दिसली. पुढे

गेल्यावर कळलं की, ते एक पुस्तकांचं दुकान आहे. 'हाऊस ऑफ बुक्स' हे त्याचं नाव. रशियनमध्ये 'दॉम क्निगी'. ही इमारत मूळ बांधली गेली ते सेंट पीटर्सबर्गमध्ये 'सिंगर' कंपनीचे ऑफीस म्हणून. १९०२ मध्ये बांधकामाला सुरुवात झाली आणि १९०४ मध्ये ते संपलं. इमारतीचं डिझाईन रशियन वास्तुविशारद पावेल सुझॉरचं. आर्टनुव्हो डिझाईन. ही इमारत सिंगर कंपनीच्या न्यू यॉर्कमधल्या इमारतीसारखी बनवायची होती, पण सेंट पीटर्सबर्गमध्ये नियम होता की, कोणतीही इमारत झारच्या 'विंटर पॅलेस'पेक्षा उंच असू नये. त्यामुळे ह्या इमारतीलाही २३.५ मीटर्स उंचीची मर्यादा आली. सुझॉरने मग एक कल्पना लढवली. इमारतीवर एक काचेचा डोम बनवून घेतला. मुख्यद्वारापासून वर बघितलं की इमारत खूप उंच वाटते, पण ती फक्त सहाच मजली आहे. पहिल्या महायुद्धाच्या वेळी इथे अमेरिकन एम्बसी काही काळ होती. रशियन राज्यक्रांतीनंतर १९१९ मध्ये ती सोव्हिएट सरकारी प्रकाशनगृहाला देण्यात आली. १९३८ मध्ये ह्याचं रूपांतर 'हाऊस ऑफ बुक्स' मध्ये झालं. शहराला नाझी जर्मनीचा वेढा असतानाही हे पुस्तकांचे दुकान सुरू होते. युद्ध संपल्यावर १९४८ साली डागडुजी करून हे दुकान पुन्हा सुरू झालं. २००४ ते २००६ मध्ये पुन्हा इमारतीची काही कामे होऊन हे दुकान पुन्हा उघडलं. आज ह्या इमारतीत हे दुकान, सिंगर कॅफे, आणि अनेक प्रकाशन संस्थांची ऑफीसेस आहेत. रशियन सोशल मिडिया कंपनी 'व्हीकॉन्टॅक्टे'चं हेड-ऑफीसही ह्याच इमारतीत आहे. ५० कोटी युजर्स असणाऱ्या कंपनीच्या नावाची पाटी ही ह्या इमारतीवर नाहीये - कारण तिच्या मूळ सौंदर्याला धक्का लागू नये म्हणून!

पुस्तकांचं दुकान आणि मी आत जाणार नाही असं शक्यच नाही! मला सेंट पीटर्सबर्ग बद्दल काही पुस्तकं हवी होती. एलियटला काही रशियन डिक्शनऱ्या वगैरे हव्या होत्या. आम्ही आतमध्ये गेलो. अतिशय भव्यदिव्य दुकान. व्यवस्थित लाईटस. रॅक्सवर त्या त्या विषयांच्या पुस्तकांच्या विषयांच्या नावाच्या पाट्या. अजून एक खासियत म्हणजे प्रत्येक शेल्फवरच्या प्रत्येक पुस्तकाची एक डेमोकॉपी. ती हाताळून किंवा चाळून पहायची. मग पुस्तक आवडलं तर पॅक्ड कॉपी घ्यायची. प्रत्येक दोन-तीन रॅक्सनंतर होस्टेसेस उभ्या. मदत करायला तत्पर. विषय सांगितला की लगेच तुम्हाला त्या विषयावरची पुस्तकं कुठे आहेत ते चटकन सांगण्यासाठी. सकाळचे १० वाजले होते तरी दुकानात भरपूर गर्दी होती. बहुतांश पुस्तकं रशियनमध्ये होती. माझी पुस्तकं फायनल करून झाली. एलियटची पुस्तकं नक्की कुठं असतील हे कळत नव्हतं. जवळच्याच एका 'पुस्तक-सुंदरी'ला विचारलं तर तिने लगेच सांगितलं की, ह्याच मजल्यावर स्टेशनरी सेक्शनच्या डावीकडे जा आणि मग 'कॉंपिटीटीव्ह एक्झाम्स' सेक्शनमध्ये डिक्शनऱ्या मिळतील. आम्ही तिथे गेलो. समोर डिक्शनऱ्या. त्याने ३ डिक्शनऱ्या घेतल्या. दुकान फिरावं म्हणून आम्ही भटकू लागलो. ह्या दुकानात सुमारे १,००,००० पुस्तकं विक्रीसाठी असतात. १,००,००० वेगवेगळी पुस्तकं. भाषाउत्पत्तीशास्त्र ते राज्यशास्त्र आणि एनाटॉमी ते स्ट्रॉलॉजी - म्हणाल त्या विषयावरची पुस्तकं. खेळांवरच्या पुस्तकांमध्ये एक रॅक बुद्धीबळांच्या पुस्तकांसाठीच होता. (सोबत फोटो पहा!) कारपोव्ह कॅस्परॉव्ह प्रभूतींची लगेच आठवण आली. दीड-तास त्या दुकानात भटकून आणि आमच्या





गवताची दोरी वळली म्हणजे तिने मत्त हत्तीसुद्धा बांधला जातो.

पुस्तकांचे पैसे देऊन आम्ही बाहेर आलो. बाहेर डावीकडे ग्रिबॉयेदोव्ह कॅनालवर मॉस्कोच्या क्रेमलिनसारखी एक इमारत दिसत होती. तिथे जायचं ठरवलं.

ही इमारत म्हणजे 'द सेव्हियर ऑन द स्पिल्ट ब्लड' चर्च. ग्रिबॉयेदोव्ह कॅनालला कॅथरीन कॅनाल जिथे काटकोनात छेदतो तिथे हे चर्च आहे. द सेव्हियर ऑन द स्पिल्ट ब्लड चर्च – हे मोठं नाव म्हणताना धाप लागत होती. चर्चच्या नावात 'ब्लड' वगैरे शब्द होता म्हणून मी आणि एलियटने ह्या चर्चचे नाव ठेवलं 'द ब्लडी चर्च'! साधं आणि सोपं!

ह्याच्या नावातल्या 'ब्लड' ला कारण आहे. १३ मार्च १८८१ रोजी झार दुसरा अलेक्झांडरची घोडागाडी इथून जात होती. त्यावर एका माथेफिरुने बॉम्ब टाकला. तो बॉम्ब फुटला पण त्याने झारला काही झालं नाही. उलट गाडी थांबवून तो त्या माथेफिरुची चौकशी करू लागला. इतक्यात त्या माथेफिरूच्या साथीदाराने दुसरा बॉम्ब झारवर फेकला. तो फुटल्यावर मात्र झारला भरपूर जखमा झाल्या. त्याचं बरंच रक्त सांडलं. तातडीने त्याला विंटर पॅलेसमध्ये नेण्यात आलं आणि काही तासातच तो दगावला. त्याच्या स्मरणार्थ ह्या चर्चच्या बांधकामाला सुरुवात झाली १८८३ मध्ये. १९०७ मध्ये हे बांधून पूर्ण झालं. आल्फ्रेड पार्लंड आणि आर्कीमॅन्ड्राईट इग्नाती हे ह्याचे वास्तुविशारद. ह्या चर्चची खासियत म्हणजे ह्यातले मोझॅकस. सुमारे ७००० स्क्वेअर मीटरचे मोझॅक्स ह्या चर्चमध्ये आहेत. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर चर्चची लूट झाली आणि बरीच खराबी झाली. १९३२ मध्ये सोव्हिएट सरकारने चर्च बंदच करून टाकले. दुसऱ्या महायुद्धातल्या नाझी वेढ्यादरम्यान हे चर्च चक्क तात्पुरते शवागार म्हणून वापरले जात होते. दुसऱ्या युद्धानंतर हे चर्च भाजीपाला आणि बटाटे ठेवायचे वेअरहाऊस झाले होते! शेवटी १९७० मध्ये ह्या चर्चची मालकी सेंट आयझॅक कॅथेड्रलकडे आली. त्यांनी ह्याची नीट डागडुजी केली आणि मोझॅकच्या म्युझियममध्ये रूपांतर केले. हे काम तब्बल २७ वर्ष चालले! म्युझियम १९९७ मध्ये उघडले. ह्याचं नाव चर्च असलं तरी आजही इथे म्युझियमच आहे.



आम्ही चालत जवळ गेलो तेव्हा समजलं की, सध्याही काही काम चालू आहे. त्यामुळे हे म्युझियम बंद आहे. आम्ही बाहेरूनच फोटो काढले आणि पुन्हा नेव्हस्की प्रॉस्पेक्टकडे निघालो. समोर कझान कॅथेड्रल होतं तिथे जायचं ठरलं.

रस्ता क्रॉस केला आणि एक भन्नाट घटना घडली. त्याविषयी पुढच्या भागात.

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# तृष्णाकाठ: एक संवेदनशील काव्यांजली

*प्रस्तुत लेखात कवी वैभव देशमुख यांच्या 'तृष्णाकाठ' या कवितासंग्रहाचे रसग्रहण प्रा. श्रीपाद जोशी यांनी केले आहे. - संपादक*

कोण मला बळ पुरवत आहे
मी खडकातून उगवत आहे...

हा मी वाचलेला त्याचा पहिला शेर. एक दिवस सप्तरंग पुरवणीत त्याची एक गझल छापून आलेली. मी त्याला फोन केला व म्हटलं मलाही गझल शिकायचीय. गप्पा मारायला भेटू या का? त्यानंतर मसाप, पुणे समोरच्या चहाच्या टपरीवर माझ्यासोबत असलेल्या डायरीवर लाल पेनाने त्याच्या हस्ताक्षरात एक मतला घेऊन साधारण कसे शेर लिहिले जाऊ शकतात याचा डेमो त्याने दिला. तेव्हापासून ते आजतागायत त्याचे अक्षर माझ्या डायरीत आहे. अक्षराहून त्याचा एक शेर आठवला :

कसा पटावा नकार या चिठ्ठीमधला
अक्षर अक्षर आले आहे छान किती!

असं म्हणतात की चांगला गझलकार हा आधी चांगला कवी असतो. वैभव देशमुखच्या गझला, त्याचे बरेच शेर मी बऱ्याच गझलकार मित्रांच्या ओठी आलेले बघितलेले आहेत. आमच्या वयातलं अंतर आणि त्याचं उत्कृष्ट लिखाण यापैकी कुठलीच गोष्ट आमच्या मैत्रीत आड येत नाही. तो आणि मी सहज 'कनेक्ट' होऊ शकतो.. म्हणूनच गझलकार वैभवच्या कवितेबद्दल मला उत्सुकता होती.


एक दिवस 'तृष्णाकाठ' हा त्याचा काव्यसंग्रह हाती पडला. चांगलं काही वाचलं की ते शब्दबद्ध करण्याची मी सवय लावून घेत असल्याने वैभवच्या तृष्णाकाठ विषयी रसिक, वाचक या नात्याने काहीतरी लिहावं वाटलं इतकंच...

वैभवच्या काव्यसंग्रहातील सुरवातीच्या कवितांचा बाज हा शेजारून धाडकन रेल्वे निघून जावी आणि आपल्या छातीत धडधड होत राहावी अशा स्वरूपाचा आहे... त्या कवितांतील बरीच वाक्ये, कडवी आपल्या हृदयात घुसतात... आपल्याला अस्वस्थ करतात... बेचैन करतात...

ही दुनिया असंच उघडत नाही दार
हे रस्ते झिजावे लागतात आपल्या टाचांना
हे दगड ठणकावे लागतात आपल्या ठेचांनी
या सावल्या पिऊन टाकाव्या लागतात हिमतीने
हे ऊन अंगावर मिरवावं लागतं वर्षानुवर्षे

असं आणि इतकं सरळसोट तो सांगून मोकळा होतो. त्याच्या बहुतांशी कवितेत ही ठणक जाणवतेच.

काहीतरी सरकतंय
मुंगीच्या पावलांनी
चरत चरत जातंय
मेंदूच्या दिशेनं
माझी हिरवी पान
काळी पडतायेत
लोक मला टाळतायेत
टाकू पाहतायेत वाळीत
अन् मी मरून जातोय
मरायच्या आधीच...




'मरायच्या आधीच मरून जाणं' हे कवितेतून रेखाटन किती वेदनादायी आहे हे मी अनुभवलंय.. त्यामुळेच ह्या ओळी आत भिनत जातात व सुन्न करून सोडतात.

पाप इतका सुंदर पोशाख घालून येते की, ते पाप आहे असे माहीत असूनही आपण त्याला कवटाळतो.

आपल्या अगोदरच्या प्रथितयश कवींच्या पखालीच आपण वाहत असतो आणि हे होत असताना आपल्या हातून साहित्य लिहीलं जात असलं तरी आपण स्वत: त्या साहित्यात दिसत नसल्याची खंत खूप भयानक असते. वैभव स्वत: त्याच्या कवितेत आपल्याला दिसतो. त्यामुळेच तर एका कवितेत 'मरणाचा लकी ड्रॉ' हा शब्दप्रयोग समोर येतो..

खरंतर हा काव्यसंग्रह वैविध्याने नटलेला आहे.. वैभवच्या कवितेत शहर, खेडं दोन्हीही डोकावतात. काही कवितांतून हळुवारपणा समोर येतो, तसेच काही कविता मस्तकात आग पेटवतात... काही भावस्पर्शी कविताही वाचायला मिळतात.. हा काव्यसंग्रह वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे वैभवच्या अनेक कवितांवर आणि त्याच्या मनावर असलेला गावाचा पगडा ... त्याची कविता अस्सल ग्रामीण नसली तरी खेड्यातून शहरात आलेल्या तरुणाची अस्वस्थता आणि त्यातून दुरून अगदी शहरातून चितारलेलं त्याचं खेडं व तिथल्या मातीविषयी त्याची असणारी ओढ हा बऱ्याच कवितांचा विषय आपल्याला शहर आणि खेड्यात पुन्हा पुन्हा वैभवच्या कवितेच्या एस. टी. मध्ये प्रवास करायला भाग पाडतो व एका वेगळ्या पातळीवर खेडं आणि शहर आपल्यासमोर येउन उभे ठाकतात.

सगळेच फोनवर बोलतायेत
सगळीच गर्दी एकटी आहे

ह्या ओळी शहरात असूनही शहराला स्वीकारायची मानसिकता बनत नाहीये आणि त्यातून होणारी मानसिक आंदोलने शब्दांकित करतात.

कवितासंग्रह वाचत जाऊ तसंतसं आपल्याला या कवितांतून वैभवची स्वतःची स्वतंत्र शैली समोर येऊ लागते.

जवळपास सगळेच येउन गेले रात्री
आता रडायचं बाकी नाही कोणी
थोड्याच वेळात भुका लागतील सगळ्यांना
ही गर्दी ओसरून जाईल दुपारपर्यंत ...

अशा ओळी समोर आल्यानंतर भर रात्री कवितासंग्रह वाचताना अंधाऱ्या रात्री दूरवर भुंकत असलेल्या कुत्र्यांचे आवाज आणखी मनाला विषण्ण करून सोडतात.

बऱ्याच कवितेतल्या काही ओळी एक आपलं वेगळेपण सांगणाऱ्या आणि स्वत:चं एक वेगळं अस्तित्व घेऊन समोर येतात.

बसची खिडकी म्हणजे एक वेगवान चित्रपट..
होताच येत नाही आउट ऑफ कव्हरेज या शहरातून

या वाक्यांना अधोरेखित करण्यावाचून पर्याय राहात नाही.

मघाशी उल्लेखल्याप्रमाणे शहरात आलेल्या तरुणाची शहराला स्वीकारता न येण्याची मानसिकता पुढे बदलताना दिसते. पण तरीही हा मानसिक गोंधळ कायम असतोच असतो हेही तितकेच खरे ...

अताशा मन निघतच नाही या शहरातून ...
आता एखादा निरोपच येतो गावाकडून
आणि ढकलत नेतो शहराच्या बस स्टँण्डवर ...

Diaspora LIterature चा अभ्यास करताना ह्या सगळ्या गोष्टी मी समजून घेतल्याअसल्याने आणि अनुभवल्यादेखील असल्याने शहर आणि खेडं यांत गुंतलेल्या मनाची चलबिचल मनाला लागून गेली.

हा काव्यसंग्रह ज्या ओळींसाठी मी विकत घेतला त्या ओळींसाठी वैभवला एक जादूची झप्पी....

प्रेम करणाऱ्या
पण लग्नाला नकार देणाऱ्या
प्रेयसीसारखं हे शहर...

---

पुढे मिळणाऱ्या आनंदाच्या कल्पनेने जे सुख मिळते; त्या सुखाचे नाव उत्साह !

ह्या ओळींतून व्यक्त होणारी त्याची तगमग मला शब्दबद्ध करता येत नाहीये. पण शहराला स्वीकारणे अपरिहार्य असते हे देखील पुढच्या ओळींतून स्पष्ट होते.

आणि एका नशेतच मान्य केल्या
या शहराच्या साऱ्या अटी ...
पायाची वणवण दिली या साऱ्या रस्त्यांना ..
पुढे एक सुंदर कडवं समोर येउन जातं.
कधीचा तहान घेऊन मी फिरतोय या शहरात कधीचा
शोधतोय ओली जागा
किती वर्षांच्या पहारी तुटून पडल्यायेत
कसे संपत नाहीयेत हे खडकांचे थर
किती खोल जाउन बसलंय या शहराचं पाणी ...

एकांताला 'नग्न एकांत' ही दिलेली उपमाही आवडून गेली...

अगदी सरळपणे ओबडधोबड आणि व्यवहार्य झालेल्या नात्यांचा शिमगा पुढच्या ओळींतून समोर येतो ...

आपण पुसतो एकमेकांची खुशाली, पण तळमळ नसते
पूर्वीसारखी
आपले शब्द अर्थाची प्रेतं वाहत असतात
आपल अडत नाही फार एकमेकांवाचून
आपण आखून घेतल्या आहेत रेषा एकमेकांच्या भोवती.
आपण रेषांच्या आतूनच बोलतो एकमेकांशी
.. कितीही प्यालो तरी आपण कंट्रोलमध्ये असतो
पोटातलं उलटून जाईल, पण मनातलं उलटत नाही...

काव्यसंग्रहातील अनेक वाक्ये आपल्याला पेनाने अधोरेखित करावी वाटतात...

आणि मोबाईल स्विच ऑफ करून बसावं असं उरलंय
काय आपल्या बोलण्यात ..?
हळूहळू आयुष्याचा गोठा झाला..
खोलीत फक्त झिरोचा उजेड
फ्यानचा आवाज आणि एक तणाव जागत असतो..

ही उद्धृत केलेली वाक्ये डोक्यात टिकटिक वाजवून जातात.

पुढे एका वेगळ्या शैलीची छान कविता समोर येते.

आपल्याच माणसाची
बरी नाही टाळाटाळ
कोणी मागतो पाऊस
त्याला देऊ नये जाळ

सोड मनातील अढी
नको झुराया लावूस
माझे डोळे चातकाचे
तुझा चेहरा पाऊस!

तृष्णाकाठ वाचायला मजा आली... यातल्या मला आवडलेल्या एका कवितेच्या काही ओळी देऊन वैभवदाला खूप साऱ्या शुभेच्छा देतो आणि थांबतो...

सांज घराशी घुटमळताना आठवते का काही?
भवताली कोणी नसताना आठवते का काही?
लाख पहारे असतानाही भेटत होतो आपण
वादळवारे असतानाही भेटत होतो आपण
पाऊस धो धो कोसळताना आठवते का काही?
सांज घराशी घुटमळताना आठवते का काही?
विसरून सारे जाण्यासाठी भेट एक ती घडली
माझ्यासोबत पक्षी रडले आणि झाडे रडली
सांग तुला आता रडताना आठवते का काही?
सांज घराशी घुटमळताना आठवते का काही?

**– प्रा. श्रीपाद जोशी**
सहाय्यक प्राध्यापक
क्लॅराज कॉलेज ऑफ कॉमर्स
वर्सोवा, मुंबई
भ्रमणध्वनी ९७३०७३०२२२

●●●

स्वातंत्र्याचे मंदिर बलिदान करणाऱ्यांच्या रक्ताशिवाय उभे राहात नाही.

# परिसर वार्ता

- संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**क्रीडा – DSO तर्फे घेतलेल्या विविध स्पर्धांत आमच्या विद्यार्थ्यांनी खालील पारितोषिके मिळवली :**

१) जलतरण – सर्वेश डोके याने मुलांच्या U17 गटात
२०० मि. बॅक स्ट्रोक
४०० मि. फ्री–स्टाईल मध्ये पदक मिळविले व मुंबई विभागात आपले स्थान निश्चित केले.

२) टेबल टेनिस –

१) रुद्र पाटील याने वैयक्तिक सुवर्ण पदक मिळविले व मुंबई विभागात आपले स्थान निश्चित केले.

२) रुद्र पाटील, आत्मज अकोलकर, अथर्व पानसरे यांनी मुलांच्या U17 गटात कांस्यपदक मिळवले.

३) कराटे –

१) चैत्राली शिरसाट, श्रेया मोघे यांनी मुलींच्या U17 गटात कांस्यपदक मिळवले.

२) सौम्या मराठे हिला मुलींच्या U14 गटात सुवर्ण पदक मिळाले व मुंबई विभागात आपले स्थान निश्चित केले.

४) कुस्ती – आर्या शिंदे हिला मुलींच्या U14 गटात सुवर्ण पदक मिळाले व तिने मुंबई विभागात आपले स्थान निश्चित करून (30 kg category) विभागीय पातळीवर कांस्यपदक मिळवले.

५) कॅरम – सर्वेश जाधव ह्याला मुलांच्या U14 गटात सुवर्ण पदक मिळाले व मुंबई विभागात आपले स्थान निश्चित केले.

६) आर्चरी – जान्हवी बेडेकर हिला मुलींच्या U17 गटात सुवर्ण पदक मिळाले व मुंबई विभागात आपले स्थान निश्चित केले.

**आमच्या पाच विद्यार्थ्यांनी 'दि बेल्ट आणि रोड टिन एजर कॅम्प', नॅनिंग, चीन येथील कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना खालील पारितोषिके मिळाली –**

१) गार्गी भागवत – कलरफुल केमेस्ट्री

२) मृण्मयी गांगल – आर्ट ऑफ मॉडेलिंग अवॉर्ड

३) आबोली शिंदे – आर्ट ऑफ प्रिटिंग

४) यतिश वैद्य – एरोप्लेन मॉडेलिंग

या कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक व उत्तम प्रकल्प सादरीकरणाबाबत प्रशस्तिपत्रक मिळाले.

५) ईशान फणसे – याने इंटेलिजंट रोबोर्ट हा प्रकल्प सादर केला. त्याला या सादरीकरणाबाबत सुवर्ण पदक व उत्तम सांघिक सहभागाबाबत प्रशस्तिपत्रक मिळाले.



**बृहन् मुंबई अध्यापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या Maths Concept Exam चा निकाल :**

| इयत्ता | श्रेणी (प्राप्त) विद्यार्थी | | | उत्तीर्ण विद्यार्थी | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | | |
| ५वी | ३ | ११ | ५ | १ | २० |
| ८वी | – | ३ | – | २ | ५ |

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | गुण | श्रेणी |
|---|---|---|---|
| ५वी | मुग्धा घाग | ९८ | अ |
| ८वी | अथर्व कामत | ८० | अ |

• भारत विकास परिषद आयोजित राष्ट्रीय समूहगान प्रतियोगिता २०१९ मध्ये आपल्या शाळेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.



## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### इंडस्ट्री रिसर्च या विषयावर अभ्यासक्रम

महाविद्यालयाच्या BAF बॅफ (अकौंटिंग आणि फायनान्स) विभागातर्फे दि. २३ ऑक्टोबर रोजी इंडस्ट्री रिसर्च या विषयावर तयार केलेल्या अभ्यासक्रमाची सांगता झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाची सुरुवात १७ ते २२ ऑक्टोबर दरम्यान महाविद्यालयात झाली. ६० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात




सहभाग घेतला होता. या अभ्यासक्रमाची सांगता मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाचे डॉ. अरविंद लुहार यांच्या व्याख्यानाने झाले. डॉ. नीलम शेख यांच्या नेतृत्वाखाली हा अभ्यासक्रम पूर्ण झाला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### प्रथम वर्ष विधी प्रवेश प्रक्रिया

प्रवेश प्रक्रिया प्रणाली अंतर्गत प्रथम वर्ष विधीच्या प्रथम फेरीतील प्रवेशास दिनांक १७ ते २१ सप्टेंबर रोजी सुरुवात करण्यात आली असून १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेलेला आहे. तसेच दुसऱ्या फेरीत २७ ते ३० सप्टेंबर दरम्यान २७ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग १ ऑक्टोबर २०१९ पासून सुरू करण्यात येतील.

### जपानच्या प्रतिनिधींची महाविद्यालयास भेट



सांस्कृतिक विस्तार कार्यक्रमा दरम्यान क्योटो सांग्यो विद्यापीठ जापान ह्यांनी विद्या प्रसारक मंडळ, ठाणे येथील शैक्षणिक परंपरेची सुरुवात करणारे विद्या प्रसारक

मंडळ ठाणे ह्यांना भेट दिली. दिनांक ३ सप्टेंबर २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसमवेत संवाद साधला.

मनु सभागृहात त्यांचे स्वागत करून त्यांना रांगोळी तसेच बांगड्यांचे प्रदर्शन दाखविण्यात आले. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी आलेले प्रतिनिधी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. विद्या प्रसारक मंडळाचे प्रतिनिधी डॉ. आगरकर व श्री. गिरीश जोशी हे देखील ह्या समयी उपस्थित होते.

तृतीय वर्ष विधीचा विद्यार्थी शाम ठाकूर ह्याने पाककला कौशल्य दाखवत रसगुल्ला बनवून दाखवला. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. सचिन त्रिभुवन ह्याने मराठी पारंपरिक नृत्य 'जोगवा' सादर केले. त्यानंतर त्यांना ते नृत्य शिकविण्यात आले. त्यानंतर त्यांना साडी नेसवून मेहंदी देखील काढण्यात आली. सर्व कार्यक्रमाअंती प्राध्यापक विनोद वाघ ह्यांनी आभार प्रदर्शन सादर केले.

**दिनांक ११ सप्टेंबर २०१९ विशेष व्याख्यान**



दिनांक ११ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. प्रभाकर आपटे ह्यांचे 'फ्रॅन्को हिंदू जुरिप्रडन्स' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**माजी विद्यार्थी कार्यकारी समिती**

माजी विद्यार्थी समितीची दुसरी बैठक दिनांक १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.०० वा. महाविद्यालय परिसरात पार पडली. महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीसाठी महाविद्यालयात अस्थित असलेले विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वि. वि. बेडेकर ह्यांनी सदर सदस्यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळण्याकरिता स्पेशल लेक्चर कार्यशाळा व व्यावसायिक शिक्षण देण्याकरिता विविध अभ्यासक्रम असावेत असा विचार समिती समोर मांडला. ह्यात माजी विद्यार्थ्यांचे योगदान असावे अशी विनंती केली.

CDC महाविद्यालय विकास समितीची बैठक दिनांक १४ सप्टेंबर रोजी ५.०० वा पार पडली. प्रभारी प्राचार्यांनी संशोधन केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव समिती समोर मांडला व सर्व सदस्यांनी त्या प्रस्तावाचा आनंदाने स्वीकार केला.

**'लिमिटेड लायब्लिटी पार्टनरशिप' कार्यशाळा**



दिनांक २१ सप्टेंबर २०१९ रोजी लिमिटेड लायब्लिटी पार्टनरशिप या विषयावर श्री. राहुल सहस्रबुद्धे यांनी कार्यशाळेस संबोधित केले.

**हेन्री डुनान्ट ह्युमॅनिटेरीयन मुटकोर्ट स्पर्धा**

इंडियन सोसायटी ऑफ इंटरनॅशनल लॉ तर्फे दिनांक २० व २१ सप्टेंबर रोजी हेन्री डुनान्ट ह्युमॅनिटेरियन मुट कोर्ट, दिल्ली येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आमच्या महाविद्यालयातील मिस. आसावरी फडके, श्री. सौरभ राव व मिस. तेजल नेमलेकर ह्यांनी संपूर्ण भारतातून आलेल्या इतर ४५ टिम्स समवेत सहभाग घेतला.

**जे. डी. एच. टी. ई. ची बैठक**

सहसंचालक उच्च शिक्षण विभाग पनवेल तर्फे दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ रोजी बिर्ला महाविद्यालय, कल्याण येथे बैठक बोलविण्यात आली होती. महाविद्यालयातील कार्यालयीन कामकाजात येणाऱ्या समस्यांविषयी प्राचार्यांकडून माहिती घेण्यात आली.

**विधी सहाय्यता केंद्राचे उद्घाटन**



दिनांक २८ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये विधी सहाय्यता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. नुकतेच वि. प्र. मं. चे टि. एम. सी. विधी महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्रधिकरण यांच्या माध्यमातून काही अनुदानास पात्र ठरविण्यास आले आहे. त्या निमित्ताने सदर कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव देशपांडे साहेब व सिव्हील जज्ज श्री. चौधरी साहेब प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद वाघ व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हजर होते. DLSA चे मेंबर सेक्रेटरी श्री. देशपांडे यांनी महाविद्यालयाचे इन्फ्रास्ट्रक्चर पाहून समाधान व्यक्त केले.

**मायनर रिसर्च प्रोजेक्ट**

मायनर संशोधन प्रकल्प 'क्रिटीकल इव्हॅल्युएशन ऑफ इंटिग्रेशन ऑफ प्रॅक्टिकल आस्पेक्ट इन प्रोफेशनल लीगल एज्युकेशन' डॉ. श्रीविद्या जयकुमार प्रभारी प्राचार्या ह्यांच्या मार्फत मुंबई विद्यापीठात समाविष्ट करण्यात आला.

**उपस्थिती नोंद**

द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद नोटीस बोर्डवर लावण्यात आली. उपस्थितीच्या बाबतीत कमतरता आढळलेल्या विद्यार्थ्यांना निवेदनपत्र सादर करण्यास सांगण्यात आले होते.

महाविद्यालयाने दिनांक २८ सप्टेंबर २०१९ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी 'परीक्षेची तयारी लिखाण' यावर एक मार्गदर्शक असे व्याख्यान आयोजित केले होते. यावर डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद वाघ, प्रा. हेतल मिशेरी, प्रा. रुपाली येरानेस, डॉ. महेश बर्वे व ॲड. यतिन पंडित यांनी मार्गदर्शन केले.

**प्रथम वर्ष विधीच्या शिकवणी वर्गास सुरुवात**

प्रवेश प्रक्रियेच्या दोन फेऱ्या पार पडल्यानंतर प्रथम वर्ष विधीच्या १२० विद्यार्थ्यांच्या शिकवणी वर्गास दिनांक १ ऑक्टोबर पासून सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वर्गात येण्यास सुरुवात केली असून त्यांना महाविद्यालय परिसर, महाविद्यालयाची इमारत, विधी अभ्यासक्रम, संधी सोयी सुविधा ह्यांचा परिचय करून देण्यात आला.

**'एकदाच वापर होणारे प्लास्टिक नको' मोहिम व श्रमदान**

दिनांक १ ऑक्टोबर रोजी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी मिळून श्रमदान मोहिमेत सहभाग घेतला. महाविद्यालयातील परिसरात असलेल्या प्लास्टिक बॉटल्स जमा करण्यात आल्या. तसेच दुसऱ्या दिवशी दिनांक २ ऑक्टोबर रोजी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या छोट्याशा संघाने ठा.म.पा.च्या श्रमदान आणि मोहिमेत तलावपाली येथे सहभाग नोंदविला. चार गोण्या व

काही बॉक्स भरून प्लास्टिक महानगरपालिकेकडे सुपुर्द करण्यात आले.

**सन्माननीय न्यायाधिश अभय ओक (चीफ जस्टीस ऑफ कर्नाटका हायकोर्ट) यांच्याबरोबर विद्यार्थ्यांची विशेष बैठक**

सन्माननीय न्यायाधीश अभय ओक ह्यांना सन्मानित करण्याकरिता एम.एच. हायस्कूल, ठाणे ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्याला सदर कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले असल्या करणाने महाविद्यालयातर्फे शाळेचे आभार मानण्यात आले. ह्या कार्यक्रमात झी मराठीचे डॉ. उदय निरगुडकर ह्यांनी न्यायाधिशांची मुलाखत घेतली. ही रंजक मुलाखात विद्यार्थ्यांसाठी एक अमुल्य अनुभव होता.

**पॅरा लीगल स्वयंसेवक**

महाविद्यालयातील लीगल एण्ड सेल द्वारे विद्यार्थ्यांना पॅरा लीगल स्वयंसेवक होण्याकरिता आमंत्रित करण्यात आले व सदर यादी ठाणे डिस्ट्रीक्ट लीगल सर्व्हिस ॲथोरिटी ह्यांना ७ ऑक्टोबर रोजी सुपुर्द करण्यात आली.

**उपस्थिती समितीची बैठक**

द्वितीय वर्ष विधी व तृतीय वर्ष विधी विद्यार्थ्यांना संदर्भात उपस्थिती समितीची बैठक दि. ११ ऑक्टोबर रोजी दु. २.०० वा. घेण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी आहे. अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करून त्या विद्यार्थ्यांना दिवाळी सुट्टी दरम्यान ग्रंथालयात उपस्थिती नोंदविणे बंधनकारक करण्यात आले.

**मराठी वाङ्मय मंडळ**

दिनांक ११ ऑक्टोबर रोजी मराठी वाङ्मय मंडळाने खुली वक्तृत्व स्पर्धेची घोषणा केली व दिनांक १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सदर स्पर्धा पार पडली. यावेळी विद्यार्थ्यांना कायद्याविषयी कोणताही विषय निवडून आपली मराठी बोलण्याची कला दाखवून देण्याची संधी देण्यात आली. श्री. यतिन पंडित व डॉ. महेश बर्वे ह्यांनी परिक्षकाची भूमिका पार पाडली.

सदर स्पर्धेमध्ये एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे -

प्रथम बक्षिस - स्वप्निल इंगळे

दुसरे बक्षिस - नाना खुंटे

तिसरे बक्षिस - राज म्हात्रे

उत्तेजनार्थ बक्षिस - हार्दिक झकारीया

**माजी विद्यार्थ्यांसाठी प्रॅक्टीकल परिक्षा**

प्रात्याक्षिक परीक्षेची दुसरी फेरी दिनांक १२ ऑक्टोबर २०१९ रोजी पार पडली. पहिल्या परिक्षेत नापास झालेले विद्यार्थी व गैरहजर असलेले विद्यार्थी देखील ह्या परिक्षेत बसले होते. सदर परिक्षेचा निकाल दिनांक १६ व २५ ऑक्टोबर रोजी जाहीर केला.

**अतिरिक्त वर्गाकरिता महाविद्यालयाचा अर्ज**

महाविद्यालयाने विधी अभ्यासक्रम ३ वर्षे या अतिरिक्त वर्गाकरिता केलेल्या अर्जासंबंधीत स्क्रुटीनी समिती समवेत बैठक दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबई विद्यापीठ, फोर्ट ह्या ठिकाणी पार पडली. सदर बैठकीस प्रभारी प्राचार्या व प्रभारी कार्यालय अधिक्षक हे उपस्थित होते.

**अमिटी युनिव्हर्सिटी नॅशनल मुट कोर्ट स्पर्धा**

अमिटी युनिव्हर्सिटी, पनवेल येथील कॅम्पसमध्ये दिनांक १८ व १९ ऑक्टोबर रोजी नॅशनल मुट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांना अमिटी युनिव्हर्सिटीने सदर स्पर्धेचे परिक्षक म्हणून निमंत्रित केले होते.

### विधानसभा निवडणूक

दिनांक २१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र विधान सभा निवडणूकीच्या दिवशी खालील कर्मचाऱ्यांनी निवडणुकीचे काम केले.

विनोद वाघ (प्राध्यापक)
शितल औतांडे (ग्रंथपाल)
रंजन करंदिकर (प्रभारी कार्यालय अधिक्षक)
मुकेश राणे (लिपिक)
संतोष झुगरे (ग्रंथालय परिचर)
राकेश पाथरे (शिपाई)
सचिन त्रिभुवन (शिपाई)

### विधी अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ

मुंबई विद्यापिठाच्या १६ ऑक्टोबर २०१९ च्या पत्रानुसार प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांना विधी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत नियुक्त करण्यात आले आहे.

### दिवाळी सुट्टी

मुंबई विद्यापिठाच्या सुचनेप्रमाणे विद्यार्थी व शिक्षकांना १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत दिवाळी सुट्टी देण्यात आली आहे.

### प्रथम वर्ष विधी प्रवेश प्रक्रिया

कॉमन ॲडमिशन प्रोसेस डीएचई, पुणे ह्यांच्यातर्फे तीन फेऱ्यांमध्ये एकूण १६८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला असून ७२ जागा अद्याप रिक्त आहेत. सदर जागा चौथ्या व शेवटच्या इन्स्टीट्युशनल फेरीत भरल्या जाणार आहेत. ॲडमिशनचा शेवटचा दिवस २६ नोव्हेंबर आहे.

### समुह चर्चा

महाविद्यालयामध्ये दिनांक ५ ऑक्टोबर रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता या कायद्याच्या १) एफआयआर २) चाप्टर प्रोसेडिंग ३) इनव्हेस्टिगेशन या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. यासाठी माजी डीसीपी नागेश लोहार, माजी डीसीपी विकास चंदनशिव, अधिवक्ता आय. ए. शेख व प्रा. विनोद वाघ यांनी सहभाग नोंदविला. या वेळेस विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

### मतदार जागरूकता चर्चासत्राचे आयोजन करण्याबाबत

आमच्या महाव्दिालयात कार्यरत असलेल्या विधी सहायता केद्रांच्या माध्यमातून मतदार जागरूकता अभियाना अतंर्गत खालील तीन कार्यक्रम करून मतदार जागृतीसाठी सहभाग नोंदविला.

१. ठाणे निवडणुक अधिकारी व आपल्या कार्यलयाच्या सुचनेप्रमाणे दिनांक ३ ऑक्टोबर २०१९ आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गडकरी रंगायतन ठाणे येथे आयोजित केलेच्या मतदार जागृती अभियानासाठी पथनाट्य स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्यातील ३८ महाविद्यालयानी भाग घेतला होता. यामध्ये आमच्या महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला.



२. आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे, कळवा येथे असलेल्या जय भगवान डि एड महाविद्यालय येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी मतदार जागृती अभियाना अतंर्गत एक नाट्य सादर करून मतदार व मतदाना सदंर्भात विविध विषयावर मार्गदर्शन केले.



३. दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे रेल्वे स्टेशन व सिडको बस स्टॉप येथे पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जागृती करण्याचा प्रयत्न केला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध लोकांच्या प्रश्नाचे देखील समाधानकारक उत्तर दिले.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या ‘इन्स्टिटय़ूट इन्व्होवेशन काऊन्सिल २.०’ ने विविध उपक्रम राबविले. त्याचा वृत्तांत खालीलप्रमाणे –

• तंत्रनिकेतनातील ४० विद्यार्थ्यांनी ‘सरदार पटेल इन्क्युबेशन सेंटर’ला ९ ऑक्टोबर २०१९ ला भेट दिली. यात ‘टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेटर’ ची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. या सेंटरने विद्यार्थ्यांना नवीन उद्योगधंदा सुरू करण्यासाठी MHRD (Government of India) विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य कशा पद्धतीने उपलब्ध केले जाते व त्यासाठी लागणारी इतर आवश्यक माहिती उत्तम रीतीने सांगितली.

**• Institution Innovation Council (IIC) with STAR Ratings of the IIC Calendar Year 2018-19**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला 3 STAR चे मानांकन मिळाले आहे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ऑक्टोबर २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ ऑक्टोबर : प्रा. कंचन अक्षय यांनी जर्नल क्लबमध्ये ’ट्रेनिंग नीड ॲनालिसिस’ या विषयावर सादरीकरण केले.

७ ऑक्टोबर : डॉ. मिनाक्षी व प्रा. कंचन यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी नवरात्र उत्सव आयोजित केला.



७ ऑक्टोबर : ब्रीम्समध्ये (ग्रीन इनिशिएटिव्हचा) पर्यावरण संवर्धन प्रयत्नाचा भाग म्हणून सौर ऊर्जा प्रणाली स्थापित केली गेली आणि त्याचे उद्घाटन करण्यात आले.



१० ऑक्टोबर : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. गौरी हेबळे या प्राध्यापकांनी एमएमएस द्वितीय वर्षाच्या वित्त शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि रिझर्व्ह

आयुष्यात पैसा हवा, पण पैशात आयुष्य नको.

बँक ऑफ इंडिया मॉनिटरी म्युझियमची शैक्षणिक भेट आयोजित केली.




ब्रीम्सच्या आय. आय. समितीने 'नावीन्यता विरुद्ध सर्जनशीलता आणि वाढीव नावीन्य विरुद्ध सतत सुधारणा' या विषयांवर वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेतील अंतिम स्पर्धक आता सीआयआयच्या वादविवाद स्पर्धेत भाग घेणार आहेत.

११ ऑक्टोबर : डॉ. मिनाक्षी मल्होत्रा आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी ब्रीम्स कनेक्ट या कार्यक्रमाचे आयोजन केले.



१२ ऑक्टोबर : डॉ. व्ही. एन. ब्रीम्समध्ये गांधी जयंतीचे १५० वे वर्ष रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून साजरे केले गेले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पल्लवी चांदवसकर आणि डॉ. मीनाक्षी यांनी केले.

ब्रीम्सच्या आय. आय. समितीतर्फे पोस्टर स्पर्धा व निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली.

१३ ऑक्टोबर: डॉ. स्मिता जपे यांनी 'जॉब प्रोफाइल्स आफ्टर एम बी. ए.' या विषयावर ब्रीम्सच्या वेबसाइटसाठी लेख लिहिला.

१५ ऑक्टोबर : ब्रीम्सच्या आय.आय. समितीतर्फे इनोव्हेशन डेच्या निमित्ताने निधी ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक श्री. ओमप्रकाश यांचे 'उद्योजकता' विषयावरील अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.

१५ ऑक्टोबर: डॉ. पल्लवी यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने ब्रीम्स लायब्ररीत 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला.

१७ ऑक्टोबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी 'कन्सेप्च्युअल मॉडेल बिल्डिंग' या विषयावर रिसर्च फोकस ग्रुप सत्राचे आयोजन केले. या सत्रानंतर एकूण ७ गट त्यांच्या शोध निबंधावर काम करत आहेत.



१८ – १९ ऑक्टोबर : युनिव्हर्सल बिझिनेस स्कूलमध्ये झालेल्या आंतर महाविद्यालयीन फुटसेल सामन्यामध्ये डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले.



१८ – १९ ऑक्टोबर : प्रा. संदीप मोघे यांनी 'इंट्रोडक्शन टू आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग' तसेच ''डेटा ॲनालीटीक विथ ''आर'' या विषयावर २ दिवसांच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमाचे आयोजन केले.



१९ ऑक्टोबर : डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी गांधी जयंतीच्या दीडशेव्या वर्षानिमित्त डॉ. व्ही. एन. ब्रीम्स आणि अन्विक्षा रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले.



२४ ऑक्टोबर : प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी जर्नल क्लबमध्ये इंडियन फायनान्शियल सेक्टर : पीएमसी बँक कोलॅप्स या विषयावर सादरीकरण केले.

२६ ऑक्टोबर: डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. कंचन यांनी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. व्ही. एन. ब्रीम्समध्ये दिवाळी उत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.


२५–२८ ऑक्टोबर : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना 'ॲनालिसीस ए +' स्पर्धेत भाग घेण्यासाठी आमंत्रित केले. एकूण ११ बाहेरील संघ या स्पर्धेत भाग घेत आहेत.

३० ऑक्टोबर–२ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना 'कस्टमर ऑब्सेशन प्रोग्राम'साठी नियुक्त मूल्यांकन समिती सदस्य म्हणून 'द हिंदू'द्वारे आमंत्रित करण्यात आले.



प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी (यूजीसीद्वारे मान्यता प्राप्त) महाराष्ट्र एस ई टी परीक्षा २०१९ उत्तीर्ण केली.

प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी वॉल स्ट्रीट मोजो येथून 'फायनान्शियल मॉडेलिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रम' पूर्ण केला.




डॉ. व्ही. एन. ब्रीम्सला सी. एस. आर.च्या बी–स्कूल सर्वेनुसार आऊटस्टँडिंग बी–स्कूल ऑफ एक्सलन्स यादीमध्ये स्थान देण्यात आले.

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

आले होते. संस्थेचे तिसरे संचालक प्राध्यापक श्रीकंठन या परिसंवादात सहभागी होणार होते. परंतु परिसंवादाच्या काही दिवसांपूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यांची जागा संस्थेच्या विविध विभागातील ज्येष्ठ शास्त्रज्ञांनी भरून काढली. त्या सर्वांनी त्यांच्या गरजा काय होत्या हे सांगून त्यासाठी ग्रॅज्युएट कोर्स कसा तयार केला याची माहिती दिली. याखेरीज चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूट (Chennai Mathematical Institute), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगलोर (Indian Institute of Science Bangalore), आयझर पुणे (Indian Institute of Science Education and Research Pune), जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली (Jawaharlal Nehru University New Delhi), होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट मुंबई (Homi Bhabha National Institute Mumbai) या संस्थेच्या प्रतिनिधींना परिसंवादासाठी पाचारण करण्यात आले होते. त्या सर्वांनी त्यांच्या संस्थेत राबविला जाणाऱ्या संशोधनपूर्व अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये सांगितली. ही चर्चा दिवसभर चांगलीच रंगली होती.

परिसंवादाच्या दुसऱ्या दिवशी पुढची दिशा ठरविण्यासाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात २१ व्या शतकातील संशोधनाचे विषय आणि त्यासाठी लागणारी तयारी यावर भाष्य करण्यात आले. आजकाल आंतरविषयक संशोधन (Interdisciplinary Research) मोठ्या प्रमाणावर केले जाते. त्यामुळे संशोधकांना विविध विषयांचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे. जीवशास्त्र या विषयात संशोधन करायचे असेल तरी विद्यार्थ्यांला सांखिकीचे ज्ञान असणे आता गरजेचे झाले आहे. विज्ञान शिक्षणात संशोधन करायचे असेल तर संशोधकांना मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक असते. याचा विचार करून संशोधनपूर्व अभासक्रम तयार करण्यात यावा या बाबीवर भर देण्यात आला.

टी. आय. एफ. आर. सारख्या संस्थेच्या ग्रॅज्युएट स्कूलला येणारे विद्यार्थी हे विद्यापीठातून पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन आलेले असतात. त्यांच्या शिक्षणक्रमात संशोधन करायला त्यांना फारशी संधी मिळालेली नसते. ते एका अर्थाने परीक्षार्थीच असतात. अशा विद्यार्थ्यांना संशोधन करायला तयार करणे हे खरोखरच मोठे आव्हान आहे. त्यासाठी ग्रॅज्युएट स्कूलची नितांत गरज आहे. भारतातील इतर विद्यापीठांनी याची दखल घेणे अत्यावश्यक आहे. टी. आय. एफ. आर. या संस्थेने केलेले काम त्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल याची खात्री वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.